cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१३ | बुधवार दि.०१ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### संयम राखत शांततेच्या मार्गाची गरज...

मध्यपूर्वेतील तणावाने पुन्हा एकदा जागतिक शांततेच्या संकल्पनेलाच आव्हान दिले आहे. अमेरिका–इस्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या संघर्षाने केवळ प्रादेशिक नव्हे, तर जागतिक स्तरावर अस्थिरतेची धोक्याची घंटा वाजवली आहे. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या संयुक्त हल्ल्यांनंतर इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला आणि ४ मार्चपासून टँकरवर हल्ल्यांची मालिका सुरू झाली.

# रब्बी पिकांना दिलासा!

## तीन राज्यांत ११,६९८ कोटींची विक्रमी खरेदी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**हरियाणा, उत्तर प्रदेश आणि कर्नाटक या तीन राज्यांमध्ये रब्बी हंगामातील कडधान्ये व तेलबियांची किमान आधारभूत किमतीत विक्रमी खरेदी करण्याचा मोठा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी राज्य सरकारांच्या प्रस्तावांना मंजुरी दिल्याने सुमारे ११,६९८ कोटी रुपयांच्या १८ लाख टन शेतमालाची खरेदी होणार आहे.**

या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांना किफायतशीर दर मिळणार असून, बाजारातील दरकपातीपासून संरक्षण



मिळणार आहे. ही खरेदी 'किंमत आधार योजना' अंतर्गत करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्रालयाने दिली. या निर्णयामुळे हरभरा, मसूर, मोहरी आणि करडई यांसारख्या महत्त्वाच्या पिकांना हमीभाव मिळणार आहे. बाजारातील चढ–उतारांमुळे होणारे नुकसान टळणार असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थिरता येण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारच्या या पावलामुळे देशातील कडधान्ये आणि तेलबियांचे उत्पादन वाढवण्यास चालना मिळेल. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अन्न व पोषण सुरक्षा अधिक मजबूत

▶▶ पान २ वर

### राज्यानुसार खरेदीचा आढावा

हरियाणा राज्यातून २,३१२ कोटी रुपयांच्या सुमारे ३.७३ लाख मेट्रिक टन हरभरा आणि मोहरीची खरेदी होणार आहे. यामध्ये १३,०८२ टन हरभरा आणि तब्बल ३.६० लाख टन मोहरीचा समावेश आहे. उत्तर प्रदेश राज्यात हरभऱ्याच्या २.२४ लाख टन खरेदीस १,३१६ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. तसेच ६.७७ लाख टन मसुरीची १००% खरेदी करण्यात येणार असून, यासाठी ४,७३९ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मोहरीच्या ५.३० लाख टन खरेदीलाही हिरवा कंदील मिळाला आहे. कर्नाटकात करडईच्या ६,९२३ टन खरेदीस मंजुरी देण्यात आली असून, ही खरेदी एकूण उत्पादनाच्या २५% असेल. करडईसाठी प्रति टन ६५,४०० रुपये निश्चित करण्यात आला आहे. यानुसार एकूण व्यवहार सुमारे ४५.२७ कोटी रुपयांचा असेल.

## शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणाची सुनावणी २३ एप्रिलला

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणी पुढील सुनावणी आता २३ एप्रिल रोजी होण्याची शक्यता आहे. यापूर्वी या सुनावणीसाठी १ एप्रिल ही तारीख सर्वोच्च न्यायालयाच्या वेळापत्रकात दर्शवण्यात आली होती. मात्र १ एप्रिलच्या पूर्वसंध्येला ही सुनावणी आणखी एकदा पुढे ढकलण्यात आली आहे. दीर्घकाळ हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.**

१२ मार्च रोजी संबंधित प्रकरणासाठी १ एप्रिल ही तारीख दर्शवण्यात आली होती. मात्र आता सुनावणी पुढे ढकलल्यामुळे ठाकरे गटाचा पुन्हा एकदा हिरमोड झाला आहे. दरम्यान, या प्रकरणात अंतिम युक्तिवाद बाकी आहे. २३ एप्रिलला सुनावणी झाल्यास शिवसेना ठाकरे गट सर्वप्रथम बाजू मांडण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार ठाकरे




गटाला युक्तिवादासाठी दीड तासांचा वेळ मिळू शकतो. त्यानंतर शिवसेना शिंदे गट त्यावर आपले मत मांडेल. केंद्रीय निवडणूक आयोगाने फेब्रुवारी २०२३ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला शिवसेना नाव आणि चिन्ह दिले होते. पक्ष नाव आणि चिन्ह यासाठी शिवसेनेच्या ठाकरे आणि शिंदे गटात गेली तीन वर्षांहून अधिक काळ न्यायालयीन लढाई सुरु आहे. शिवसेना ठाकरे गटाने जुलै २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयात पक्ष नाव आणि चिन्हा निर्णयासंदर्भात अंतरिम अर्ज केला होता. यामध्ये महाराष्ट्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

▶▶ पान २ वर

## भोंदू अशोक खरातने अजित पवारांवर 'जादूटोणा' केला

### फोटोवर फुल्या मारल्याचा रोहित पवारांचा दावा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूचा संबंध भोंदू अशोक खरातशी जोडण्याचा प्रयत्न केला. खरातकडे फोटोवर फुल्या मारण्याची पद्धत होती आणि त्यानुसार अजित पवार यांच्यासह महाराष्ट्रातील एका मोठ्या नेत्याच्या फोटोवर फुल्या मारण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.**

रोहित पवार यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये



म्हटले आहे की, जादूटोणासारख्या अंधश्रद्धांना महाराष्ट्र कधीही भीक घालत नाही. मात्र अशा प्रकारच्या भोंदूगिरीमागील कलुषित हेतू दुर्लक्षित करता येणार नाही. अशोक खरातने कुणाच्या सांगण्यावरून फोटोवर फुल्या मारण्याचा प्रकार केला? तसेच त्यामागचा हेतू काय होता, हे समोर येणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, भोंदू अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे गंभीर आरोप आहेत. सध्या तो नाशिक पोलिसांच्या कोठडीत असून त्याच्याविरुद्ध एकूण १० गुन्हे दाखल आहेत. यापैकी ८ गुन्हे लैंगिक शोषणाचे, तर २ गुन्हे आर्थिक फसवणुकीचे आहेत. या प्रकरणामुळे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांना आधी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा आणि त्यानंतर पक्षाच्या महिला

▶▶ पान २ वर

## भाजपाच्या कार्यकर्ता शिबिरास जिल्हाध्यक्ष शंकराचा कानाडोळा





**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील विशेषतः आष्टी –पाटोदा –शिरूर मतदार संघातील भाजप कार्यकर्त्यांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियान शिबिर कडा येथे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन आमदार सुरेश धस यांनी केले होते मात्र या दोनही दिवशी शिबिराकडे भाजपाचे जिल्हाध्यक्ष असलेले शंकर देशमुख यांनी दांडी मारल्याने पुन्हा एकदा भाजपातील गटातटाच्या राजकारणाची चर्चा सुरू झाली आहे.

आष्टी –पाटोदा –शिरूर मतदार संघातील कडा येथे भाजपाच्या वतीने आमदार सुरेश धस यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय भाजप कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होत. दोन दिवसीय शिबिरामध्ये अनेक कार्यकर्त्यांनी हजेरी लावली. या प्रशिक्षण शिबिरासाठी भाजपाचे राज्य प्रवक्ते केशव उपाध्ये, नवनाथ बन यांनी हजेरी लावली व त्यांनी कार्यकर्त्यांना पक्ष बळकटीसाठीचे मार्गदर्शन केले. विशेषतः या कार्यक्रमाला बीड जिल्हा भाजपाचे अध्यक्ष यांनी उपस्थित राहणे गरजेचे होते मात्र त्यांनी आपल्याच पक्षाच्या कार्यकर्ता शिबिराकडे पाठ फिरवल्याने उलट सुलट चर्चा सुरू झाली आहे. बीड जिल्ह्यामध्ये भाजपाचा म्हणजेच पंकजा मुंडे यांच्या गटाचे जिल्हाध्यक्ष असल्याने त्यांनी

▶▶ पान २ वर

### आ.धस यांनी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढवला

कडा येथे पक्षाच्या वतीने आयोजित कार्यकर्ता शिबिरामध्ये मतदारसंघातील अनेक कार्यकर्त्यांनी हजेरी लावली. विशेषतः याच प्रशिक्षण शिबिरामध्ये काही मनोरंजन कार्यक्रम झाले. या कार्यक्रमात स्वतः आमदार सुरेश धस यांनी हिंदी चित्रपटातील गाणे गाऊन पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साह वाढवला.

## पत्नीच्या माहेरच्या संपत्तीवर माहेरच्यांचाच अधिकार



**पुणे । प्रतिनिधी**

हिंदू उत्तराधिकार कायद्याबाबत आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा निकाल दिला आहे. जर एखाद्या हिंदू महिलेला तिच्या आई–वडिलांकडून वारसाहक्काने मालमत्ता मिळाली असेल आणि तिचा मृत्यू मृत्यूपत्र न करता झाला, तर त्या मालमत्तेवर तिच्या पतीचा किंवा सासरच्या मंडळींचा कोणताही कायदेशीर अधिकार राहणार नाही. अशी मालमत्ता थेट महिलेच्या वडिलांच्या वारसांकडे जाईल असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती तरलादा राजशेखर राव यांनी हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६ च्या कलम १५(२)(अ) चा आधार घेत हा निकाल दिला. न्यायालयाने म्हटले की कायद्यातील तरतूद स्पष्ट आहे. जर एखाद्या हिंदू महिलेला तिच्या पालकांकडून मालमत्ता

▶▶ पान २ वर

### महत्त्वाचा निर्णय...

हा निकाल त्या सर्व प्रकरणांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे जिथे महिलांना त्यांच्या माहेरून मोठी संपत्ती मिळते. अपत्यहीन महिलांच्या बाबतीत मालमत्ता सासरच्या वारसांकडे जाण्याऐवजी पुन्हा माहेरच्या कुटुंबाकडे (वडिलांच्या वारसांकडे) कशी वळवली जाते, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

# आजपासून टोल नाक्यावर रोख रक्कम घेणे बंद

## १ एप्रिलपासून नवा नियम लागू, फास्टॅग किंवा यूपीआय हे दोनच पर्याय




**दिल्ली । वृत्तसंस्था**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने टोल वसुलीच्या नियमात मोठा बदल केला असून, १ एप्रील पासून देशातील सर्व टोल प्लाजावर रोख रकमेने टोल भरता येणार नाही. आता टोल भरण्यासाठी केवळ फास्टॅग किंवा यूपीआय हे दोनच पर्याय उपलब्ध असतील.

टोल नाक्यांवरील वाहतूक कोंडी कमी करणे आणि डिजिटल व्यवहारांना चालना देणे, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे. डिजिटल पेमेंटमुळे टोल नाक्यावरून गाड्या वेगाने पुढे सरकतील, ज्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल. तसेच, वाहनांच्या लांबच लांब रांगा कमी झाल्यामुळे इंधनाची बचत होईल आणि प्रदूषणावरही नियंत्रण येईल. याशिवाय टोल वसुलीमध्ये अधिक पारदर्शकता येईल, असा विश्वास 'एनएचएआय'ने व्यक्त केला आहे. डिजिटल इंडियाच्या दिशेने हे एक मोठे पाऊल

▶▶ पान २ वर


### फास्टॅग हाच सर्वात सुरक्षित मार्ग

गाडीला फास्टॅग नसेल किंवा त्यात पुरेसा बॅलन्स नसेल, तर टोल नाक्यावर अडचणीचा सामना करावा लागू शकतो. अशा परिस्थितीत दंड भरावा लागण्याचीही शक्यता आहे. जरी टोल बूथवर क्यूआर कोड स्कॅन करून यूपीआयद्वारे पेमेंट करण्याची सोय असेल, तरीही तांत्रिक बिघाड किंवा नेटवर्कच्या समस्येमुळे यूपीआय पेमेंटमध्ये अडथळे येऊ शकतात. त्यामुळे फास्टॅग असणे हाच सर्वात सुरक्षित मार्ग आहे.

## बोगस दिव्यांग अधिकाऱ्यांवर कारवाई करणाऱ्या तुकाराम मुंढेंची बदली

**मुंबई । प्रतिनिधी**

धडाडीचे आयएएसस अधिकारी अशी ओळख असलेले तुकाराम मुंढे यांची दिव्यांग विभागातून राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य विभागात बदली करण्यात आली आहे. दरम्यान, राज्यातील प्रशासनामध्ये मोठे फेरेबदल करण्यात आले असून, १० बड्या आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामध्ये मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव अश्विनी भिडे यांची मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



राज्य सरकारने ३१ मार्च रोजी १० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश दिले आहेत. अनेक महत्त्वाच्या पदांवर नवीन नियुक्त्या करण्यात आल्यामुळे प्रशासनात मोठी हालचाल पाहायला मिळत आहे. तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग कल्याण विभागात काम करत असताना बोगस दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून अधिकारी झालेल्यांवर कारवाईचा सपाटा लावला होता. त्यामध्ये अनेक जिल्ह्यांतील

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### खरात प्रकरणाने महायुती सरकार पोखरले–सपकाळ

मुंबईः अशोक खरात प्रकरणावर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भोंदू अशोक खरात प्रकरणाने राज्यातील महायुती सरकार पोखरले आहे. महिलांच्या लैंगिक शोषणाचे ५८ व्हिडिओ असल्याचे सांगितले जात असेल तरी त्यांची संख्या मोठी आहे. पण गृहविभागाकडून काही सिलेक्टिव्ह व्हिडिओच लिक केले जात आहेत, त्यामागे मोठे षडयंत्र आहे. खरातच्या सीएकडे मोठ्या प्रमाणात घबाड सापडल्याच्या बातम्या येत आहेत, हा पैसा नेमका कोणाचा असा सवालही यावेळी उपस्थित केला. सपकाळ म्हणाले की, देशात पेट्रोल पंपावर व एलपीची गॅस साठी रांगा लागत आहेत, याचे खापर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्यावर फोडले हे हास्यास्पद आहे.

### लिअँडर पेस तृणमूलमधून भाजपमध्ये दाखल

कोलकाताः पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मोठी घडामोडी घडली आहे. भारताचा दिग्गज टेनिसपटू लिएंडर पेस यांनी मंगळवारी (दि. ३१) अधिकृतपणे भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. पाच राज्यांमध्ये होणार्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पेस यांचा हा प्रवेश भाजपसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. दरम्यान, ऑक्टोबर २०२१ मध्ये, पेस यांनी गोव्यामध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याकडून तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. पश्चिम बंगालमध्ये मिळवलेल्या दणदणीत विजयानंतर त्यांनी गोव्यामध्ये निवडणुका लढवण्याचा निर्णय तृणमूल काँग्रेसने घेतला होता. दिल्लीतील एका पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री किरण रिजिजू आणि भाजपचे नेते सुकांत मुजुमदार यांच्या उपस्थितीत भाजपचे सदस्यत्व देण्यात आले.

### शीतला देवीच्या मंदिरात चेंगराचेंगरी; ८ जणाचा मृत्यू

नालंदाः बिहारमधील नालंदा जिल्ह्यातील माघरा येथे माता शीतला मंदिरात शीतला देवीच्या पूजेवेळी चेंगराचेंगरी झाली आहे. या चेंगराचेंगरीत ८ भाविकांचा मृत्यू झाल्याची तर मोठ्या प्रमाणावर भाविक जखमी झाल्याची बातमी समोर येत आहे. चैत्र महिन्यातील शेवटच्या मंगळवारी नालंदा येथील शीतला देवी मंदिरात दर्शन आणि पूजेसाठी मोठ्या संख्येने भाविक जमले होते. मंदिरात पोलीस बंदोबस्त अत्यंत कमी होता. त्यातच काही भाविकांनी दर्शनासाठी गडबड करत रांग तोडली. भाविक एकमेकांच्या अंगावर चढू लागले. त्यामुळे गोंधळ निर्माण झाला. या गोंधळामुळे शीतला देवी मंदिरात भाविक एकमेकांच्या अंगावर पडले. चेंगराचेंगरीची माहिती मिळतात पोलीस घटनास्थळी पोहचले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणत आता बचाव कार्य सुरू केले.

### अशोक खरातचा मुलाला पोलिसांच्या ताब्यात

नाशिक : भोंदू अशोक खरातच्या पत्नीची चौकशी करायला गेलेल्या नाशिक पोलिसांनी अशोक खरातच्या मुलाला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणात पोलिसांनी जलदगतीने हालचाली करत ही कारवाई केली आहे. अशोक खरातची पत्नी कल्पना खरातवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केल्यानंतर ती फरार झाल्याची माहिती समोर आली. अशोक खरातसोबत त्याची पत्नी कल्पना खरातवर शिर्डी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर नाशिक पोलीस कल्पना खरातची चौकशी करण्यासाठी खरातच्या निवासस्थानी गेले. मात्र, कल्पना खरात आधीच फरार झाल्याची माहिती समोर आली.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० मार्च २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५६.०० क्विंटल | १,९२३ | २,६०१ | २,२४४ |
| ज्वारी/हायब्रिड: १६१.५० क्विंटल | १,७०० | ४,२०० | ३,२१७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.०० क्विंटल | ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी:५५.०० क्विंटल | २,४०० | २,७५० | २,६३९ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: २१.०० क्विंटल | ४,९०० | ५,०५० | ४,९९८ |

cmyk

## अग्रलेख

# संयम राखत शांततेच्या मार्गाची गरज...

मध्यपूर्वेतील तणावाने पुन्हा एकदा जागतिक शांततेच्या संकल्पनेलाच आव्हान दिले आहे. अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या संघर्षाने केवळ प्रादेशिक नव्हे, तर जागतिक स्तरावर अस्थिरतेची धोक्याची घंटा वाजवली आहे. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या संयुक्त हल्ल्यांनंतर इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला आणि ४ मार्चपासून टँकरवर हल्ल्यांची मालिका सुरू झाली. या घडामोडींनी जगाच्या ऊर्जा पुरवठ्याच्या 'लाईफलाईन'लाच धक्का दिला आहे. या पार्श्वभूमीवर जागतिक ख्यातीचे अर्थतज्ज्ञ जेफ्री सॅक्स यांनी संयुक्त अरब अमिरातीला दिलेला इशारा अत्यंत गंभीर आहे. ''दुबई आणि अबू धाबी उद्ध्वस्त होऊ शकतात,'' असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. हा केवळ भावनिक उद्गार नसून, युद्धाच्या संभाव्य परिणामांचा वास्तववादी अंदाज आहे. पर्यटन, वित्त आणि जागतिक गुंतवणुकीचे केंद्र बनलेली ही शहरे युद्धाच्या थेट धोक्यात येऊ शकतात, ही बाबच चिंताजनक आहे.

दुबई आणि अबू धाबी यांनी गेल्या दोन दशकांत तेलाधारित अर्थव्यवस्थेपासून दूर जाऊन आधुनिक, विविधीकृत आर्थिक मॉडेल उभे केले. लक्झरी पर्यटन, आंतरराष्ट्रीय व्यापार, वित्तीय सेवा आणि तंत्रज्ञान क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय प्रगती साधली आहे. जगभरातील पर्यटक, गुंतवणूकदार आणि उद्योजक यांना आकर्षित करणारी ही शहरे आज 'ग्लोबल सिटी' म्हणून ओळखली जातात. परंतु युद्धाची एक ठिणगी या प्रगतीला राख करून टाकू शकते, ही भीती आता प्रत्यक्ष वाटू लागली आहे.

या संघर्षाचा सर्वात मोठा परिणाम ऊर्जा क्षेत्रावर झाला आहे. होर्मुझ सामुद्रधुनी ही जगातील सुमारे २० टक्के तेल आणि गॅस पुरवठ्याची प्रमुख वाहिनी मानली जाते. ती बंद झाल्याने ब्रेंट क्रूडचे दर ७० डॉलरवरून १००-१२० डॉलरपर्यंत झेपावले. परिणामी युरोप, आशिया आणि विशेषतः भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये महागाईचा भडका उडाला आहे. इंधन दरवाढीचा थेट परिणाम वाहतूक, शेती, उद्योग आणि दैनंदिन जीवनावर होत आहे. युद्धाचे दुष्परिणाम केवळ इंधनापुरते मर्यादित नाहीत. शिपिंग आणि एअर ट्रान्सपोर्टमध्ये अडथळे निर्माण झाल्याने जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. अन्नधान्य, खतं आणि औद्योगिक कच्चामाल यांचा पुरवठा प्रभावित झाला आहे. यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानाला मोठा धोका निर्माण झाला आहे. एकूणच, हे युद्ध 'मध्यपूर्वेतील संघर्ष' न राहता 'जागतिक आर्थिक संकट' बनत आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणावरही या पार्श्वभूमीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. 'अमेरिका फर्स्ट' या धोरणामुळे मध्यपूर्वेत स्थैर्य निर्माण होण्याऐवजी तणाव वाढल्याचे दिसून येते. अब्राहम ॲकॉर्ड्‌समुळे काही काळ शांततेची आशा निर्माण झाली होती, परंतु त्यानंतरच्या घडामोडींनी परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची केली. इतिहास साक्ष देतो की, युद्ध कधीच अंतिम समाधान देत नाही. पहिले महायुद्ध आणि दुसरे महायुद्ध यांनी मानवजातीला प्रचंड हानी दिली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र संघसारख्या संस्थांची स्थापना झाली, ज्याचा उद्देशच शांतता राखणे हा होता. तरीही इराक युद्ध, अफगाणिस्तान युद्ध आणि रशिया-युक्रेन युद्ध यांसारख्या संघर्षांनी हे सिद्ध केले की, युद्धाचे चक्र अजूनही थांबलेले नाही. आजच्या परिस्थितीत जेफ्री सॅक्स यांचा इशारा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्यांनी मांडलेली भूमिका केवळ आर्थिक विश्लेषण नाही, तर जागतिक शांततेसाठीचा स्पष्ट संदेश आहे. कूटनीती, संवाद आणि बहुपक्षीय सहकार्य हाच या संकटातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग आहे. मध्यपूर्वेतील ही धग जर आणखी भडकली, तर त्याचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागतील. दुबई-अबू धाबीसारख्या समृद्ध शहरांचे भविष्य धोक्यात येणे म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेच्या एका महत्त्वाच्या आधारस्तंभालाच तडा जाणे होय. त्यामुळे सर्व संबंधित देशांनी संयम राखत, युद्धाऐवजी शांततेचा मार्ग स्वीकारणे हीच काळाची गरज आहे.

शेवटी, एक गोष्ट स्पष्ट आहे की, युद्धात कोणीही जिंकत नाही. जिंकते ती फक्त विध्वंसाची सावली. आणि म्हणूनच, जगाने आता 'शांततेच्या राजकारणा'कडे वळण्याची वेळ आली आहे.

# अमृत पाणी पुरवठा योजनेची टेस्टिंग झाल्याशिवाय हस्तांतरण नाही

## विशेष सभेत पालिका पदाधिकारी ठाम, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांची माहिती

**बीड । प्रतिनिधी**

**शहराला पाणी पुरवठा रणाऱ्या महत्वाकांक्षी ११४ कोटी रुपयांच्या 'अमृत' पाणी पुरवठा योजनेचे काम गेल्या काही वर्षांपासून रखडलेले आहे. पाण्यासारखा पैसा खर्च होऊनही बीडकर मात्र तहानलेलेच अशी परिस्थिती जीवन प्राधिकरण आणि कंत्राटदार यांच्या संगणमताने झाली. केवळ कागदोपत्री कामे केल्याचे दाखवून कोट्यावधी रुपये उचलून कंत्राटदाराने बोबारा केला. वेळोवेळी त्याला पत्र देऊनही तो कोणत्याही बैठकांना हजर राहत नाही. ज्या कामाची देयके अदा झाली आहेत ती कामे प्राधिकरणाचे अधिकारी प्रत्यक्षात दाखवू शकत नाहीत त्यामुळे रखडलेल्या अमृत पाणी पुरवठा योजनेची प्रत्यक्ष टेस्टिंग झाल्याशिवाय नगर परिषद ही योजना हस्तांतरीत करून घेणार नाही अशी ठाम भुमिका पालिका पदाधिकाऱ्यांनी विशेष सभेत घेतली असल्याची माहिती उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांनी दिली.**



सन २०१७ मध्ये बीड शहरासाठी अमृत पाणी पुरवठा योजना मंजुर झाली, ११४ कोटी रुपये किंमतीच्या योजनेच्या कामाची मुदत २४ महिन्यांची असतानाही मुदतीत काम पूर्ण न होता अपूर्ण आणि कागदावर काम केल्याचे भासवून कंत्राटदाराला कोट्यावधी रुपयांची देयके संगणमताने अदा करण्यात आली. प्राधिकरणाने ही योजना नगर परिषदेला हस्तांतरीत करून घेण्याविषयी पत्रव्यवहार केला. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता पारवे यांनी सोमवार, दि.३० मार्च रोजी नगर परिषदेच्या विशेष सभेचे आयोजन केले. या सभेत अनेक पालिका सदस्यांनी वस्तुस्थिती मांडून बीड शहराच्या पाणीपुरवठा योजनेची कशी विल्हेवाट लावली ? याचा पाढाच सभागृहात मांडला. माजलगाव डॅमपासून जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत पाण्याची आवक ७ एमएलडी ने कमी असणे, अनेक कामे अपूर्ण ठेवणे, वितरण नलिकेचे काम अपूर्ण असणे, दोन जलकुंभ बंद असणे, निकृष्ट दर्जाची कामे करणे, पाईप न आंथरता ते काम केल्याचे कागदोपत्री दाखविणे, चुकीचे सर्व्हेक्षण करणे, तांत्रिक चाचणी न घेता १०० टक्के देयके अदा करणे आदी गंभीर स्वरुपाच्या बाबी लक्षात आल्यामुळे ही योजना हस्तांतरीत करून घेण्यास पालिका प्रशासनाने स्पष्ट शब्दांत विरोध केला आहे. या बाबत पाणीपुरवठा सभापती तथा उपाध्यक्ष विनोद मुळूक यांनी माहिती देताना सांगितले की, अमृत पाणीपुरवठा योजना ही बीड शहरातील नागरीकांसाठी अतिशय महत्वाकांक्षी योजना आहे. मात्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अख्त्यारीत ही योजना गेल्यामुळे संपुर्ण योजनेचा बोजवारा उडाला. कंत्राटदाराने संबंधितांशी आर्थिक संगणमत करून कोट्यावधी रुपयांची उचल करून पोबारा केला आहे, कंत्राटदार पालिकेच्या आणि जिल्हा प्रशासनाच्या कोणत्याही बैठकांना उपस्थित राहत नाही. जीवन प्राधिकरणाने योजनेची चाचणी करून दिल्याशिवाय आम्ही त्याचे हस्तांतरण होऊ देणार नाहीत असा ठराव आजच्या विशेष सभेत आम्ही घेतला आहे. विशेष सभेच्या अनुषंगाने आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. श्रीमती सुनेत्रावहिणी अजितदादा पवार यांच्याकडे हा विषय आम्ही घेऊन जाणार आहोत. शहराला सुरळीत आणि स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी भविष्यात आमचे प्रयत्न असून त्यासाठी कटिबध्द असल्याचे उपाध्यक्ष विनोद मुळूक यांनी सांगितले.

### " अमृत पाणीपुरवठा योजनेची तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी वाट लावली

स्थायी समितीचे सदस्य अमर नाईकवाडे आणि गटनेते फारुक पटेल यांनी अमृत पाणीपुरवठा योजने बाबत सभागृहात अभ्यासपूर्ण माहिती दिली. यावेळी दोघेही चांगलेच आक्रमक झाल्याचे पहावयास मिळाले. तत्कालीन नगराध्यक्ष यांनी ही योजना जीवन प्राधिकरणाकडे दिल्यामुळेच बीडकरांवर ही वेळ आली असून तत्कालीन पदधिकाऱ्यांनी या योजनेची वाट लावल्याचा आरोप त्यांनी केला. यासाठी त्यांनी उच्च न्यायालयातही लढा दिला होता. अमर नाईकवाडे आणि फारुक पटेल यांच्या अभ्यासपूर्ण भुमिकेमुळे तीस वर्षे पालिकेवर सत्ता भोगणाऱ्या क्षीरसागरांचे भांडेफोड झाल्याची चर्चा कालपासून बीड शहरात ऐकावयास मिळत आहे.

# जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी रोखणे व किमतीमध्ये नियंत्रण ठेवणे-जिल्हाधिकारी मित्तल

## नियमाचे उल्लंघन केल्यास कारवाई करणार

**जालना । प्रतिनिधी**

**जीवनावश्यक वस्तूंची अवैध साठेबाजी रोखणे, किंमत नियंत्रण आणि साठेबाजीवर प्रतिबंध घालण्याबाबत.**



जालना जिल्ह्यातील सर्व नागरिक आणि व्यापायांना या आदेशाद्वारे सूचित करण्यात येते की, जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत मला प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून, मी आशिमा मित्तल, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, जालना आदेश निर्गमित करत आहे की, जालना जिल्ह्यामध्ये अन्नधान्य, कडधान्ये, किराणा वस्तु, पेट्रोल, डिझेल तसेच घरगुती गॅस व या अधिनियमांतर्गत येणाऱ्या इतर सर्व जीवनावश्यक वस्तूंची विनापरवाना किंवा मंजूर मयदिपेक्षा जास्त साठेबाजी () करण्यास सक्त मनाई आहे. कोणत्याही जीवनावश्यक वस्तूची विक्री शासनमान्य दरापेक्षा जास्त दराने किंवा छापील किमतीपेक्षा () अधिक दराने केल्याचे आढळल्यास, तो गंभीर अपराध मानला जाईल. सर्व व्यापायांनी दरपत्रक दर्शनी भागात लावणे अनिवार्य आहे. जिल्हयातील सर्व पाऊक व किरकोळ व्यापाःयांनी साठवणुकीच्या नियमांचे पालन करावे. साठवणूक मयदिचे उल्लंघन झाल्यास संबंधित माल जप्त करण्यात येईल. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा व्यापाऱ्यावर जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३ व ७ नुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल आणि कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि पुरवठा निरीक्षण अधिकारी यांनी या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी आणि संशयास्पद ठिकाणांची तपासणी करून अहवाल सादर करावा. तसेच याबाबत नागरिकांना आव्हान करण्यात येते की, असे काही आढळून आल्यास हेल्पलाईन नं. ०२४८२-२२३१३२ यावर संपर्क साधावा.

# जैन समाजाची मिरवणूक महावीर जन्मकल्याणक उत्साहात साजरा

**अंबड । प्रतिनिधी**

**सकल जैन समाजातर्फे अंबड शहरात भगवान महावीर जन्मकल्याणक निमित्त भव्य व दिमाखदार मिरवणूक काढण्यात आली. शहरातील विविध मार्गांवरून पार पडलेल्या या मिरवणुकीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



ही मिरवणूक भ. महावीर मंदिर येथून प्रारंभ होऊन मेहेरबाबा मंदिर मार्गे नार्थेकर चौकात पोहोचली. त्यानंतर चंद्रप्रभू शांतिनाथ मंदिर येथे ध्वजारोहण करण्यात आले पुन्हा मंदिर परिसरात आगमन झाले. मंदिरात भगवान महावीर यांचा विधिवत अभिषेक करण्यात आला व मंदिराबाहेर ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर सायंकाळी मिरवणूक नात्रेकर चौक, महाराष्ट्र द्वार, बीएसएनएल टॉवर परिसर, शिवसेना गल्ली मार्गे पुढे जात बसस्टॅण्डसमोरून मुख्य मार्गाने भ.महावीर चौक येथे पोहोचली. येथेही भगवान महावीर यांचा चौकास अभिवादन करून मिरवणुकीची सांगता करण्यात आली. मिरवणुकीदरम्यान ''जिओ और जीने दो'' या भगवान महावीरांच्या संदेशाचे घोषवाक्य देत भक्तांनी उत्साह वाढवला. तसेच ''आगे वाले बोलो जय महावीर पीछे वाले बोलो जय महावीर'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. या मिरवणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे भगवान महावीर यांच्या विचारांचे दर्शन घडवणारे फलक, आकर्षक सजावट आणि भक्तिमय वातावरण होते. संपूर्ण रॅली आनंदी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

# भाजपच्या महाअभियानांतर आ.धस यांच्या उपस्थितीत कडा-आष्टी मंडळातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**आष्टी । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टीच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानांतर्गत आष्टी तालुक्यात आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली भव्य प्रशिक्षण शिबिर व नियुक्ती सोहळ्याचे प्रभावी आयोजन करण्यात आले. संघटन बळकटी आणि कार्यकर्त्यांना दिशा देणाऱ्या या उपक्रमाला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**




या कार्यक्रमात कडा व आष्टी मंडळातील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. स्वरूपसिंह हजारी, भाजप नेते देविदास नागरगोजे आणि चंद्रकांत फड यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून संघटन अधिक सक्षम करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी सक्रिय भूमिका पार पाडावी, असे आवाहन केले. उपाध्यक्ष सुखदेव दगडू खाकाळ, उध्दव सदाशिव गर्जे, जयसिंग ईश्वर गव्हाणे, रेश्मा आजिनाथ शेळके, सविता रघुनाथ घुले, विकास रतन क्षिरसागर सरचिटणीस रमेश दिनकर तांदळे, राजेंद्र निवृत्ती गावडे चिटणीस प्रतिभा मल्हारी शिंदे, दत्तात्रय गणपत वाडेकर, तेजस्वीनी सचिन दळवी, प्रतिभा बाळासाहेब थोरवे, सुनिता हनुमंत अडागळे, गणपत निवृत्ती अस्वर कोषाध्यक्ष निळकंठ गोपाळराव रक्टाटे उपाध्यक्ष ॲड. बाळासाहेब महादेव झांबरे, सुंदरलाल बाबुराव गर्जे, सुरेखा गोवर्धन तळेकर, बबनराव रामराव करांडे, पोपट भाऊसाहेब धुमाळ, भगवान पाटीबुवा सांगळे सरचिटणीस सिंधु लालासाहेब शिंदे, शालन अशोक मुळे चिटणीस गुलाब उमर 'सय्यद पटेल, छाया संजय पवार, रुपाली बाळासाहेब पवार, माणीक नागनाथ दहिफळे, सादीक अब्दुलगणी कुरेशी, निळकंठ निवृत्ती खेडकर कोषाध्यक्ष विष्णु मच्छिद्र खाडे नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचे आमदार सुरेश धस यांनी अभिनंदन करत, ''पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवून संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने जबाबदारीने काम करावे,'' असे आवाहन केले. याचबरोबर, या प्रशिक्षण शिबिराचा समारोपही उत्साहात पार पडला. शिबिराद्वारे कार्यकर्त्यांना संघटनात्मक बांधणी, पक्षाची विचारधारा, प्रभावी संवादकौशल्य आणि कार्यपद्धती याबाबत सखोल मार्गदर्शन मिळाले. यामुळे आगामी काळात पक्षाच्या कामाला अधिक गती मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. समारोप प्रसंगी भाजप प्रवक्ते व नगरसेवक मा. नवनाथजी बन यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत पक्षाच्या आगामी वाटचालीची दिशा स्पष्ट केली. त्यांनी कार्यकर्त्यांनी समाजात सक्रिय राहून जनतेच्या प्रश्नांवर काम करण्याचे आवाहन केले.या भव्य आयोजनातून आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली भाजपा संघटना अधिक मजबूत होत असून, तळागाळात पक्षाचा विस्तार वेगाने होत असल्याचे चित्र दिसून आले. या प्रशिक्षण अभियानात भाजपा सोशल मीडिया सेल प्रदेशाध्यक्ष प्रकाशजी गाडे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्ताजी महाजन, हिंदुत्ववादी कार्यकर्ते व इतिहास अभ्यासक पवन मोगरेकर, विधानसभा प्रमुख गणेश शिंदे, माऊली जरांगे, कडा मंडळ अध्यक्ष अनिल ढोबळे, आष्टी मंडळ अध्यक्ष रमेश गावडे यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी, बुथप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख आणि युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विनयभंगाच्या आरोपातून एकाची निर्दोष मुक्तता

## आरोपीच्या वतीने ॲड. डीजे चव्हाण यांनी मांडली बाजू

**वडवणी । प्रतिनिधी**

**विवाहित महिलेचा विनयशीलतेचा अपमान करण्याच्या उद्देशाने केलेल्या कृतीवरून मोरवड येथील नवनाथ लंबाटे यांच्यावर वडवणी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल होऊन सदरील प्रकरण वडवणी न्यायालयात दाखल होऊन चालले असता यामध्ये सबळ पुराव्या भावी व आरोपीचे वकिलाचा बचावात्मक युक्तिवाद ग्राह्य धरून सदरील प्रकरणातून आरोपीची निर्दोष मुक्तता करण्याचा आदेश माननीय न्यायालय वडवणी यांनी दिलेला आहे.**



वडवणी तालुक्यातील मोरवड येथील एक विवाहितेचा विनय शिलतेचा अपमान करण्याच्या उद्देशाने अपमान कारक शब्द वापरून जीवे मारण्याची धमकी दिल्याची फिर्याद वडवणी पोलीस स्टेशनला दिल्यावर गुन्हा रजिस्टर नंबर २५६/२०२२ नुसार कलम ५०९,५०४,५०६ भादविनुसार आरोपी नवनाथ लंबाटे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेल्या होता. सदरील प्रकरणाचा तपास ए ए क्षीरसागर यांनी करून सदरील दोषारोपपत्र माननीय न्यायालय वडवणी येथे दाखल करण्यात आलेले होते यामध्ये सरकारी पक्षाच्या वतीने सहा साक्षीदारांचे जवाब घेण्यात आले यामध्ये आरोपीच्या वतीने अँड. डि. जे. चव्हाण यांनी बचावात्मक उलट तपास घेऊन आरोपीच्या वतीने माननीय न्यायालयासमोर खंबीर बाजू मांडली व युक्तिवाद केला यामध्ये सदर प्रकरणात आरोपीच्या विरुद्ध आरोप सिद्ध करण्यासाठी भक्कम पुरावा न मिळाल्यामुळे व आरोपीच्या वतीने करण्यात आलेला बचावात्मक युक्तिवाद ग्राह्य धरून सबळ पुरावे अभावी आरोपातून आरोपीची माननीय न्यायालय वडवणी यांनी निर्दोष मुक्तता केलेली आहे या प्रकरणात आरोपीच्या वतीने अँड. डी जे चव्हाण यांनी काम पाहिले तर त्यांना अँड.पि के तिडके यांनी मार्गदर्शन केले व सहकार्य म्हणून अँड.गजानन खताळ, व अँड.अनंत काळे यांनी काम पाहिले आहे.

## पान १ वरून...

### रब्बी पिकांना

करण्याच्या उद्दिष्टालाही बळ मिळणार असल्याचे कृषी मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. निष्कर्ष : अंतर्गत होणारी ही विक्रमी खरेदी शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणार असून, शेती क्षेत्राला स्थैर्य देणारा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

----------

### भोंदू अशोक खरातने अजित

प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. रोहित पवार यांनी अंधश्रद्धेच्या मुद्द्यावर भाष्य करताना डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा उल्लेख केला. त्यांनी म्हटले की, दाभोळकरांच्या महाराष्ट्रात जर अशा भोंदूगिरीवर विश्वास ठेवला जात असेल, तर पुढच्या पिढीसमोर चुकीचा संदेश जात आहे. हे प्रकरण जितके भयावह आहे, तितकेच राज्याच्या भविष्यासाठी धोकादायक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी सकाळी रोहित पवार यांनी आणखी एक गंभीर आरोप करत अशोक खरातला तुरुंगातच संपवण्याचा डाव रचला जात असल्याचे म्हटले होते. त्यानुसार, अनेक मोठ्या नेत्यांपर्यंत धागेदोरे पोहोचत असल्याने खरातला आत्महत्या किंवा इतर कारण दाखवून संपवण्याचा प्रयत्न होऊ शकतो, अशी चर्चा असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, अजित पवार यांच्या अपघाताबाबत माहिती असलेल्या व्ही. के. सिंग यांना कोणत्याही परिस्थितीत वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचाही आरोप त्यांनी केला. दोषींना शिक्षा झालीच पाहिजे; मात्र सत्य दडपण्यासाठी कोणाचा जीव घेणे किंवा कुणाला वाचवणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ''सत्य लपवण्यासाठी एवढा अट्टहास का? कितीही प्रयत्न केला तरी सत्य लपवता येत नाही, ते कधीतरी बाहेर येते,'' असे म्हणत रोहित पवार यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

------------

### शिवसेना पक्ष आणि चिन्ह

निवडणुकीत शिवसेना शिंदेगटाला पक्षाचे नाव शिवसेना आणि चिन्ह धनुष्यबाण चिन्ह गोठविण्यात यावे, अशी मागणी केली होती. यावर ऑगस्ट महिन्यात सुनावणी होणार होती. मात्र ती लांबणीवर पडली. यानंतर ८ ऑक्टोबर रोजी झालेल्या सुनावणीवेळी १२ नोव्हेंबर २०२५ पासून आम्ही सलग सुनावणी घेवून या प्रकरणाचा निकाल देऊ, असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी स्पष्ट केले होते. मात्र यानंतरही सुनावणी पुढे गेली आहे.

-------------

### पत्नीच्या माहेरच्या संपत्तीवर

मिळाली असेल आणि तिला स्वत:ची मुले नसतील, तर तिच्या मृत्यूनंतर ती मालमत्ता पतीला न मिळता तिच्या वडिलांच्या कायदेशीर वारसांकडे हस्तांतरित होईल. हे संपूर्ण प्रकरण एका मालमत्तेच्या वादातून सुरू झाले होते. २००२ मध्ये एका आजीने आपल्या मालमत्तेचा एक हिस्सा आपल्या पहिल्या नातीला भेट म्हणून दिला होता. २००५ मध्ये या पहिल्या नातीचा (मालमत्ताधारक) कोणत्याही अपत्याशिवाय मृत्यू झाला. नंतर २०१२ मध्ये नातीच्या मृत्यूनंतर, आजीने ते 'गिफ्ट डीड' रद्द केले आणि मृत्यूपत्राद्वारे ती मालमत्ता आपल्या दुसऱ्या नातीच्या (याचिकाकर्ता) नावे केली. यावर पहिल्या नातीच्या पतीने आक्षेप घेतला आणि महसूल विभागाने त्याच्या बाजूने निकाल दिला होता. याचिकाकर्त्याने (दुसरी नात) या वादाला उच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यांनी असा युक्तिवाद केला की, हिंदू उत्तराधिकार कायद्याच्या कलम १५(२)(अ) नुसार, त्यांच्या बहिणीच्या निधनानंतर तिच्या पतीला (प्रतिवादी ५) मालमत्तेत कोणताही अधिकार उरला नाही. कारण ती मालमत्ता तिला तिच्या आजीकडून (वडिलांच्या रक्ताच्या नात्यातून) मिळाली होती. न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य केला आणि स्पष्ट केले की, मृत पत्नीला मिळालेल्या माहेरच्या संपत्तीवर पती मालकी हक्क सांगू शकत नाही. त्यामुळे, आजीने केलेले फेरबदल आणि त्यानंतर झालेली वसीयत कायदेशीररित्या वैध ठरवण्यात आली.

---------

### भाजपाच्या कार्यकर्ता शिबिरास

आमदार धस यांनी आयोजित केलेल्या शिबिराकडे पाठ फिरवल्याचेही बोलले जात आहे. विशेष म्हणजे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्याच मतदारसंघांमध्ये हा कार्यक्रम होता. त्यांच्या या गैरहजरी मुळे पुन्हा एकदा मतदार संघामध्ये भाजपामध्ये दोन गट असल्याचे दिसून आले. जिल्हाध्यक्षांनी कानाडोळा केला असला तरी आमदार धस यांनी तेवढ्याच ताकतीने हे प्रशिक्षण शिबिर यशस्वी करून दाखवले हे मात्र निश्चित. जिल्हाध्यक्ष देशमुख आपल्याच पक्षाच्या या कार्यक्रमाकडे का बरे गेले नसावेत, त्यांना कोणी जाऊ नका म्हणून सांगितले की काय अशी देखील चर्चा आहे.

----------

### बोगस दिव्यांग अधिकाऱ्यांवर कारवाइ

जिल्हा परिषदेतील शेकडो कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई सुरू असतानाच आता त्यांची बदली करण्यात आली आहे.

**मुंडे यांच्या २१ वर्षांत २५ वेळा बदल्या**

बीड जिल्ह्याचे भुमीपुत्र असलेले ज्येष्ठ आएएएस अधिकारी तुकाराम मुंडे हे अत्यंत कठोर कर्तव्य आणि शिस्तप्रीय अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी आजवर ज्या ज्या विभागात काम केले आहे ते अत्यंत पारदर्शक आणि अपप्रवृत्तींना रोखण्याचे काम केले आहे. त्यांच्या धडक काम करण्याच्या पद्धतीमुळे अनेक भ्रष्ट अधिकारी, कर्मचारी अडचणीत सापडलेले आहेत. यामुळेच ते ज्या विभागात जातील तिथे त्यांची दहशत असते. याचसाठी त्यांची बदली करण्याचा आग्रह केला जातो. आता पर्यंतच्या त्यांच्या २१ बर्षांच्या कारकिर्दीत त्यांची सुमारे २५ वेळा बदली झाली आहे.

--------

### आजपासून टोल नाक्यावर

मानले जात आहे. यामुळे हायवेवरील प्रवास अधिक वेगवान, सोपा आणि शिस्तबद्ध होणार आहे. मात्र, जे नागरिक अजूनही पूर्णपणे डिजिटल पेमेंटचा वापर करत नाहीत, त्यांच्यासाठी सुरुवातीला हा बदल थोडा कठीण ठरू शकतो.

-----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. १ एप्रिल २०२६



## थोडक्यात

### ॲड.हनुमंत जाधव यांची गोदावरी महामंडळाच्या वकील पॅनलवर नियुक्ती

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुकातील युसूफवडगांवचे सुपुत्र तथा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद येथील खंडपीठात वकीली करणारे अँड. हनुमंत जाधव यांची गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद येथील वकील पॅनल नियुक्ती करण्यात आली आहे.



गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद विभागातील ८ जिल्हे तसेच अहमदनगर व नाशिक अशा एकुण १० जिल्ह्यातील भूसंपादन संबंधित विविध न्यायालयीन प्रकरणे,सेवाविषयक प्रकरणे, औद्योगीक न्यायालय,कामगार न्यायालय,कंत्राटदारांचे दावे,भुमी संपादन,पुनर्वसन व पुर्नस्थापना प्राधिकरण,महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण तसेच लवादा प्रकरणी न्यायालयीन कामकाजासाठी नवीन वकील पॅनल तयार करण्यात आला असुन या वकीली पँनलमध्ये युसुफवडगांवचे सुपुत्र अँड.हनुमंत जाधव यांनी आपल्या बुद्धी चातुर्य,कायदे विषयकी गाढा अभ्यास,मेहनत व वकील कौशल्यांचा जोरावर यामध्ये स्थान पटकावले आहे याबद्दल त्याचे सर्वच स्तरातुन अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

### धावपळीच्या जीवनात हरवलेले 'जगणे' पुन्हा शोधा – यजुर्वेद्र महाजन यांचे प्रेरणादायी प्रतिपादन

आष्टी । प्रतिनिधी

आधुनिक जीवनशैलीत वाढती धावपळ, स्पर्धा आणि विचारांचा गोंधळ यामुळे आजचा माणूस खऱ्या अर्थाने जगणेच विसरत चालला आहे. सुख, समाधान आणि आनंद बाहेर शोधण्याच्या नादात तो स्वतःपासून दूर जात आहे. त्यामुळे प्रत्येकाने स्वतःकडे वळून जीवनाचा खरा अर्थ शोधण्याची गरज आहे, असे प्रभावी प्रतिपादन दीपस्तंभ फाऊंडेशनचे यजुर्वेद्र महाजन यांनी केले.

महावीर जयंतीनिमित्त आष्टी जैन श्रावक संघाच्या वतीने सोमवार, दि. ३० मार्च रोजी आनंदऋषी महाराज चौक येथे जिंदगी ना मिलेगी दोबारा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महाजन यांनी उपस्थितांना जीवनमूल्यांवर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला आमदार सुरेश धस, माजी आमदार साहेबराव दरेकर, जेष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे, नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, रंगनाथ धोंडे, विजयसेठ मेहर, संजयसेठ मेहर, अतुल सेठ मेहर, राहुल मुथा, रवी सेठ मेहर, आदिनाथ सानप, प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, दत्ता काकडे, उत्तम बोडखे, बाळासाहेब मेहर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यजुर्वेद्र महाजन यांचे विचार यावेळी बोलताना महाजन म्हणाले की, मानवजन्म अत्यंत दुर्मिळ आणि अनमोल आहे. माणूस विचारांच्या गोंधळात अडकून स्वतःचे अस्तित्व विसरत आहे. पैसा, प्रतिष्ठा आणि भौतिक सुखांच्या मागे धावताना तो मानसिक समाधान गमावत आहे. ते पुढे म्हणाले की, आनंद हा बाह्य गोष्टींमध्ये नसून आपल्या अंतर्मनात असतो. प्रत्येक दिवस कृतज्ञतेने जगल्यास जीवन अधिक समृद्ध होते. स्वतःवर प्रेम करणे, इतरांना मदत करणे आणि वर्तमान क्षणाचा आनंद घेणे हेच खरे जीवनमंत्र आहेत.

समाजातील वाढत्या मानसिक तणावावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, आज प्रत्येक पाच व्यक्तींमागे एक व्यक्ती मानसिक समस्यांना सामोरे जात आहे. यावर मात करण्यासाठी संवाद वाढवणे, सकारात्मक विचार ठेवणे आणि एकमेकांना आधार देणे अत्यंत गरजेचे

आमदार सुरेश धस यांनी आपल्या भाषणात सांगितले की,यजुर्वेद्र महाजन हे समाजातील वंचित, अनाथ, अपंग व तृतीयपंथी घटकांसाठी आशेचा किरण ठरले आहेत. दीपस्तंभ फाऊंडेशनच्या माध्यमातून ते या घटकांना केवळ आश्रय देत नाहीत, तर शिक्षण, संस्कार आणि स्वाभिमानाने जगण्याची दिशा देतात. त्यांच्या कार्यामुळे अनेकांचे आयुष्य बदलले असून समाजात सकारात्मक परिवर्तन घडत आहे.

महाजन यांचे कार्य अत्यंत व्यापक आणि हृदयस्पर्शी असून ते प्रत्यक्ष अनुभवण्यासारखे आहे. अशा समाजसेवकांची आजच्या काळात नितांत गरज असून त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन प्रत्येकाने समाजासाठी काहीतरी करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय बोगावत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सय्यद अल्लाउद्दीन यांनी केले, तर आभार प्रदर्शन विजय बोगावत यांनी मानले.

# प्रभू श्रीरामांच्या तत्त्वावर पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाचा कारभार -नवनाथ बन

## सरकारचे योजना सर्वसामान्यापर्यत पोहचवणे ही आपली जबाबदारी –आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

कडा येथे आष्टी व कडा मंडळाच्या वतीने आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा सांगता समारंभ उत्साहात पार पडला. या वेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते तथा मुंबई महानगरपालिकेचे सदस्य नवनाथ बन यांनी प्रमुख मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा गौरव करत, प्रभू श्रीरामचंद्रांच्या तत्त्वांवर आधारित शासनपद्धती देशात राबवली जात असल्याचे प्रतिपादन केले.

नवनाथ बन आपल्या विस्तृत भाषणात म्हणाले की, प्रभू श्रीरामचंद्र हे राजघराण्यात जन्मले तरी त्यांनी जनतेच्या कल्याणासाठी वनवास स्वीकारला आणि त्या कठीण परिस्थितीतही त्यांनी आदर्श, कर्तव्यनिष्ठा आणि संयम यांचे पालन केले. त्यामुळेच त्यांना 'मर्यादा पुरुषोत्तम' ही उपाधी प्राप्त झाली. त्याचप्रमाणे भारतीय जनता पार्टी नेही अनेक वर्षे सत्तेबाहेर राहून संघर्षाचा काळ अनुभवला. या 'वनवासातून' बाहेर पडलेले प्रभावी नेतृत्व म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी असून त्यांनी देशाला स्थैर्य, विकास आणि सुरक्षिततेची नवी दिशा दिली आहे.

ते पुढे म्हणाले की, भारतीय जनता पार्टीच्या विचारांची पायाभरणी करताना अनेक पिढ्यांनी त्याग केला. अटल बिहारी वाजपेयी, लाल कृष्ण अडवाणी,मुरली मनोहर जोशी, यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांनी पक्षाची विचारधारा देशभर पोहोचवली. आज त्याच विचारांच्या बळावर पक्ष देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने जागतिक स्तरावर आपले स्थान अधिक बळकट केले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिमा उंचावली असून अनेक देश भारताकडे आदराने पाहत आहेत. गरीब, वंचित, शोषित, दलित व आदिवासी घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना राबवण्यात आल्या आहेत. घरकुल, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा, डिजिटल सेवा या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली असून सामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रातील राजकारणावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासकामांना वेग आला असून जनतेने त्यांना पुन्हा एकदा संधी दिली आहे. कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी अधिक सक्रिय राहण्याचे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस होते. तसेच व्यासपीठावर भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रकाशजी गाडे, भाजप सोशल मीडिया सेल प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्ताजी महाजन, हिंदुत्ववादी कार्यकर्ते व ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पवन मोगरेकर, आष्टी विधानसभा प्रमुख गणेश नाना शिंदे, सामाजिक कार्यकर्ते माऊली जरांगे, कडा मंडळ अध्यक्ष अनिल ढोबळे, आष्टी मंडळ अध्यक्ष रमेश गावडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय समारोपात आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, २०१४ ते २०१९ या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या विकासकामांमुळेच जनतेने युतीला मोठा पाठिंबा दिला होता. त्यांच्या कार्याची हीच खरी पावती होती. मात्र त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी वेगळी राजकीय भूमिका घेतल्यामुळे परिस्थिती बदलली. तरीही देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षात राहूनही आपले नेतृत्व सिद्ध केले आणि 'मी पुन्हा येईन' या शब्दाला खरे ठरवत पुन्हा सत्तेत येऊन कामगिरी केली.सरकारने देखील अनेक योजना राबविल्या असून सरकारचे योजना सर्वसामान्यापर्यत पोहचवणे ही आपली जबाबदारी असल्याचे प्रतिपादन आ.सुरेश धस असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित कार्यकर्त्यांचा उत्साह, शिस्तबद्धता आणि संघटनाबद्दलची निष्ठा विशेषत्वाने जाणवली. या सहा दिवसीय प्रशिक्षण महाअभियानात तालुक्यातील पदाधिकारी, बूथप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख, महिला पदाधिकारी, युवा कार्यकर्ते आणि विविध आघाड्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. शेवटी आयोजकांच्या वतीने सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## धनादेश न वटल्या प्रकरणी प्रकाश पवार यांना एक वर्ष कारावास आठ लाख दहा हजार रुपये दंड दंड न भरल्यास तीन महिने कारावास

अंबाजोगाई । प्रतिनिधी

धनादेश न वटल्या प्रकरणी आरोपी प्रकाश भिमराव पवार राहणार मैंदवाडी तांडा तालुका परळी जिल्हा बीड याला एक वर्ष कारावास आठ लाख दहा हजार रुपये दंड दंड न भरल्यास तीन महिने साधा करावास प्रकरणाची हकीकत खालील प्रमाणे सन २०१०-११ साठी फिर्यादी अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना यांनी ऊसतोड मुकदम सोबत ऊस पुरवठा करण्यासंबंधी करार करण्यास सुरुवात केली असता आरोपी प्रकाश भीमा पवार यांनी फिर्यादी कारखान्यात येऊन आरोपी हा स्वतः वाहन मालक असल्याने फिर्यादी कारखान्यात येऊन दिनांक ३०-०७-२०१० २०१०रोजी दोन साक्षीदारासमक्ष ऊस पुरवठा करण्याचा कारखान्यासोबत करार केला करायला असे मान्य केले की कारखाना सुरू झाल्या पासून कारखाना बंद होईपर्यंत आरोपी प्रकाश भीमा पवार हा इत्यादी कारखान्यात ऊस पुरवठा करेल कराराप्रमाणे ऊस पुरवठा नाही केला तर उचल रकमेवर १८% व्याज देईल आरोपीने केलेल्या मागणीप्रमाणे फिर्यादी कारखान्याने आरोपी प्रकाश भीमा पवार संपूर्ण हंगामासाठी उचल म्हणून तीन लाख रुपये दिले आरोपी प्रकाश भीमा पवार यांनी कराराप्रमाणे फिर्यादी कारखाने का सोबत संपूर्ण हंगाम संपेपर्यंत कारखान्यास ऊस पुरवठा केला नाही म्हणून फिर्यादी कारखान्याने आरोपी प्रकाश भीमा पवार यांच्याकडे उचल दिलेल्या रकमेची मागणी केली असता आरोपी प्रकाश विमा पवार यांनी फिर्यादी कारखान्याच्या हक्क २०-०२-२०१८ रोजी घेतलेली उचल व त्यावरील व्याज अशी एकूण रक्कम रुपये ४ लाख ५४ हजार ७१७ फिर्यादी कारखान्याच्या हातात धनादेश दिला व रक्कम मिळून जाईल असा विश्वास दिला आरोपीने दिलेला धनादेश फिर्यादी कारखान्याने २८-०२ +२०१८ रोजी फिर्यादीने कारखान्याच्या खात्यावर आरोपीने दिलेला धनादेश जमा केला असता आरोपीच्या खात्यावर धनादेश वाटणे एवढी रक्कम नाही म्हणून फिर्यादी कारखान्यास एक तीन अठरा रोजी मेमोसह धनादेश परत केला फिर्यादी कारखान्याने भादिशा वरील रक्कम मिळाल्यामुळे धनादेशावरील रक्कम न मिळाल्यामुळे फिर्यादी कारखान्याने आरोपी प्रकाश भीमा पवार यास कारखान्याचे प्रवीण मेटे यांच्यामार्फत १५०३-२०१८ रोजी नोटीस पाठवली आरोपी नोटीस मिळूनही फिर्यादी कारखान्याची धनादेशावरील रक्कम इत्यादी कारखान्यास दिली नसल्याने फिर्यादी अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याने आरोपी प्रकाश भीमा पवार यांच्याविरुद्ध आंबेजोगाई येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयात फिर्याद दाखल केली प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीच्या विधीज्ञ यांनी फिर्यादी कारखान्याच्या वतीने गोवर्धन पवार व लालासाहेब इंगळे या दोन साक्षीदाराची साक्ष घेतली फिर्यादी कारखान्याच्या वतीने कारखान्याची विधीज्ञ यांनी दाखल केलेले कागदपत्र व घेतलेले साक्षी पुरावा व कारखान्याच्या विधी तज्ञांनी केलेला युक्तिवाद दिवाणी न्यायाधीश व स्तर क्रमांक तीन यांनी ग्राह्य धरून आरोपी प्रकाश भीमा पवार यास एक वर्ष कारावास आठ लाख दहा हजार रुपये दंड दंड न भरल्यास तीन महिने साधी शिक्षा अशी शिक्षा दिनांक ३०-०३+२०१६ रोजी आरोपी प्रकाश भीमा पवार यास दिली कारखान्याच्या वतीने कारखान्याचे विधीज्ञ ॲडवोकेट प्रवीण योगीराज मेटे यांनी काम पाहिले.



## पान ६ वरुन...

### परळीत गुन्हे शाखेचे मोठे कोम्बींग

ठेवून पहाटेच्या सुमारास अचानक छापा टाकण्यात आला.

अटक केलेले आरोपी

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे खालीलप्रमाणे आहेत:

१. कंबर उर्फ डंबर शहाजहान ईराणी (वय ४५ वर्ष, रा. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर, सध्या रा. परळी).

२. हसनैन बरकतअली मिर्झा बेग उर्फ ईराणी (वय २० वर्ष, रा. भिवंडी, कल्याण, सध्या रा. परळी).

तीन गुन्ह्यांची कबुली, ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

पोलिसी खाक्या दाखवताच आरोपींनी धारूर, आष्टी आणि शिवाजीनगर या तीन पोलीस ठाण्यांतर्गत केलेले चोरीचे गुन्हे मान्य केले आहेत. त्यांच्याकडून पोलिसांनी ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, तपासात आणखी मोठे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. आरोपी हसनैन हा मुंबई-ठाणे परिसरातील गंभीर गुन्ह्यात फरार होता, अशी माहिती तपासात समोर आली आहे.

यांनी केली कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, धनंजय ढोणे आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.सध्या दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी धारूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### माजलगावमध्ये झोका

असल्याने त्यांची नात वृंदा (वय ९) आपल्या लहान बहिणीसह घराच्या वरच्या मजल्यावर असलेल्या झुल्यावर खेळण्यासाठी गेली होती. तेथे एका खुर्चीवर चढून झोका हातात घेत असताना अचानक खुर्ची खाली कलंडली आणि झोक्याची दोरी वृंदाच्या गळ्याला अडकली. यामध्ये तिचा जागीच गुदमरून मृत्यू झाला.बऱ्याच वेळानंतरही वृंदा जेवण्यासाठी खाली येत नसल्याने तिची आई तिला पाहण्यासाठी वरच्या मजल्यावर गेली. तेव्हा तिला वृंदा लटकलेल्या अवस्थेत दिसली. आईने फोडलेला हंबरडा ऐकून वडील, आजी आणि आजोबांनी तातडीने धाव घेतली. तिला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. वृंदाच्या जाण्याने शाळेतील शिक्षक आणि वर्गमित्रांनाही मोठा धक्का बसला आहे.

### दोन हजाराच्या लाचेची

याला सिरसाळा येथील मुख्यालयातून ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई बीड एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार प्रदीप सुरवसे, बिडकर, काळे तसेच चालक म्हेत्रे यांनी केली. दरम्यान, या प्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

### ईशानी जोशी ऑलिंपियाड

हे यश अन्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. या यशासाठी मुख्याध्यापक विष्णु सोनवणे,विभाग प्रमुख वर्षा मुंडे,स्पर्धा परिक्षा प्रमुख कृष्णा वाघमारे आदीसह इतर शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ईशानीच्या घवघवीत यशाबद्दल तिचे व पालकांचे संस्थाध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, उपाध्यक्ष ज्योती ठाकुर,कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य,प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे,इतर पदाधिकारी स्थानिक व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष डॉ. अतूल देशपांडे, कार्यवाह किरण कोदरकर,शालेय समिती अध्यक्ष उन्मेश मातेकर यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

### दहा वर्षे पोलिसांना

तपासात कोणते मोठे खुलासे होतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

सिस्टीमवरच मोठे प्रश्नचिन्ह!

या अटकेने केवळ एक गुन्हेगार जेरबंद झाला नाही, तर संपूर्ण न्याय आणि पोलीस यंत्रणेवरच अनेक अनुत्तरित प्रश्न उभे राहिले आहेत.आता शहरात दबक्या आवाजात खालील प्रश्नांची चर्चा रंगत आहे.राजकीय वरदहस्त कुणाचा? तब्बल १० वर्षे हा आरोपी कोणाच्या राजकीय छत्राखाली सुरक्षित होता? सापडत नव्हता की वाचवला जात होता? सत्ताधारी पक्षाचा जिल्हाप्रमुख पदावर असलेला नेता पोलिसांना खरंच सापडत नव्हता की त्याला जाणीवपूर्वक सापडू दिले जात नव्हते?


प्रशासनाचा डोळेझाकपणा: कायद्याच्या डोळ्यावर पट्टी बांधून त्याला एवढी वर्षे मोकाट फिरण्याची मुभा कुणी दिली होती?

पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि राजकीय हस्तक्षेपावर या प्रकरणामुळे आता खुलेआम प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची पाळेमुळे खणून काढल्यास आणखी काही धक्कादायक नावे समोर येण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

## शेत रस्ते अडवणाऱ्याची आता गय नाही थेट पाच वर्षे सरकारी योजनेसाठी होणार अपात्र – प्रा. आंधळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक ०१/०४/ २०२६ शेत व पानद रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या किंवा रस्त्याचे नुकसान करणाऱ्या विरोधात आता कठोर कारवाईची तरतूद करण्यात आली असून अशा व्यक्तीचे आधार कार्ड आणि फार्मर आयडी तब्बल पाच वर्षासाठी ब्लॉक करण्यात येणार आहे यामुळे संबंधित व्यक्ती शासनाच्या विविध योजना आणि मदतीसाठी अपात्र ठरणार आहे. मुख्यमंत्री बळीराजा शेत पानद् रस्ते योजनेच्या अंमलबजावणीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निर्णय घेतला असून महसूल विभागाने याबाबतचा आदेश जारी केलेला आहे त्यामुळे या पुढच्या काळात गाव नकाशावर असलेल्या किंवा शासकीय जागेतील रस्त्यावर अतिक्रमण असल्यास तहसीलदार संबंधीतांना





सात दिवसाची नोटीस देतील या मुदतीत अतिक्रमण न काढल्यास शासन स्तरावरून ते हटवले जाईल विशेषता ज्या ठिकाणी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता किंवा मामलेदार अधिनियमाच्या अधीन राहून शेतकऱ्यांना ये जा करण्याचा हक्क मिळाले ला आहे अशा रस्त्यावर कोणालाही पीक लागवड करता येणार नाही या योजनेसाठी कोणतेही भूसंपादन केले जाणार नाही जे शेतकरी स्वतः होऊन जमीन देतील त्यांना नोंदणीकृत दानपत्र किंवा हक्क सोडपत्र करून द्यावे लागेल अशा नोंदणीसाठी आवश्यक असणारे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी माफ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सरकारने घेतला आहे एकदा दिलेली जमीन पुन्हा परत मागण्याचा हक्क शेतकऱ्याला राहणार नाही. विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये पाच प्रगतशील शेतकऱ्याची निवड करण्याची पद्धत ही बदलण्यात आली आहे आता संबंधित विधानसभा क्षेत्रातील कोणत्याही पाच शेतकऱ्याचा समावेश करण्याचा अधिकार समितीचे अध्यक्ष म्हणून स्थानिक आमदारांना देण्यात आलेला आहे तरी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेत पाणंद रस्त्यावर कोठेही अतिक्रमण करू नये किंवा रस्त्याचे नुकसान करू नये असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## विद्यार्थिनी व पालकांसाठी आरोग्य जनजागृती मेळावा गर्भाशय कॅन्सर जनजागृतीनंतर HPV लसीकरणाला सुरुवात

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात दिनांक ३०/ ०३/ २०२६ रोजी पाटोदा शहरातील प्रियदर्शिनी माध्यमिक कन्या शाळा व वसंतराव माध्यमिक शाळा येथे विद्यार्थिनी व पालकांसाठी भव्य आरोग्य जनजागृती व समुपदेशन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात आठवी ते नववीच्या वर्गातील मुलींसह त्यांच्या पालकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.हा कार्यक्रम डॉ.नरेशजी कासट ढकज पाटोदा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींना गर्भाशयाच्या कॅन्सरचे वाढते प्रमाण, त्याची कारणे, लक्षणे तसेच त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय याबाबत सखोल माहिती देण्यात आली. विशेषतः वय वर्ष १४ ते १५ वयोगटातील मुलींसाठी क्झत लसीकरण अत्यंत आवश्यक असल्याचे अधोरेखित केले.



समुपदेशक चव्हाण यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत त्यांच्या शंकांचे निरसन केले व आरोग्याबाबत सजग राहण्याचे आवाहन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींमध्ये सकारात्मक प्रतिसाद दिसून आला.या कार्यक्रमात ढछज दराडे मॅडम यांची उपस्थिती विशेष ठरली. दराडे मॅडम यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना लसीकरणाचे महत्त्व सोप्या व प्रभावी भाषेत समजावून सांगितले. तसेच पालकांनाही आपल्या मुलींच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उपस्थित आशा वर्कर यांनीही शासकीय आरोग्य योजनांची माहिती देत लसीकरणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमानंतर तत्काळ विद्यार्थिनींसाठी क्झत लसीकरण मोहीम राबविण्यात आली. पात्र मुलींना प्रत्यक्ष लस देण्यात आली असून या उपक्रमामुळे जनजागृतीसोबतच प्रत्यक्ष कृतीही झाल्याने कार्यक्रमाला अधिक परिणामकारक स्वरूप प्राप्त झाले. कार्यक्रमाच्या शेवटी पालक मेळाव्यात पालकांशी संवाद साधण्यात आला. पालकांनी या उपक्रमाचे स्वागत करत अशा आरोग्यविषयक उपक्रमांची गरज व्यक्त केली. या उपक्रमामुळे पाटोदा शहरात आरोग्याबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थिनी व पालकांमध्ये क्झत लसीकरणाबाबत जागरूकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

# बीडमध्ये लक्ष्मण शक्ती सोहळा व हनुमान जन्मोत्सव कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

**श्री संत ज्ञानेश्वर नगर, बीड येथे भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती सर्वांना उपस्थित राहण्याचे श्री गंगाधर आगरकर व श्री दक्षिण मुखी हनुमान मंदिर कामेटीचे अध्यक्ष / मुख्य आयोजक श्री जगन्नाथ यमपुरे (हनुमान सेवक) यांनी आवाहन केले आहे श्री संत ज्ञानेश्वर नगर, बीड येथे सध्या धार्मिक, आध्यात्मिक आणि भक्तिमय वातावरणात लक्ष्मण शक्ती व हनुमान जन्मोत्सव च्या भव्य कार्यक्रमाचे आयोजन.**

दिनांक २/४/२०२६ वार गुरुवार रोजी करण्यात आले असून या सोहळ्याला भाविकांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. परिसरात दररोज हरिनामाचा गजर, अभंगांचा निनाद आणि कीर्तन-प्रवचनांमुळे भक्तीचा अनोखा माहोल निर्माण झाला आहे. हा सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता सामाजिक ऐक्य, श्रध्दा आणि संस्कृती जपणारा उत्सव ठरत असुन बीड शहरासाठी एक प्रेरणादायी पर्वणी ठरत आहे.

या पवित्र सोहळ्यानिमित श्री संत एकनाथ महाराज यांच्या भावार्थ रामायण पवित्र ग्रंथावर आधारित भावार्थ रामायण कथा दिनांक ६ नोव्हेंबर २०२५ पासून अखंड सुरू असून दिनांक २/४/२०२६ वार गुरुवार रोजी लक्ष्मण शक्ती चा व हनुमान जन्मोत्सव कार्यक्रम सकाळी ठीक ६.३३ वाजता होणार आहे.तसेच लक्ष्मण शक्ती कार्यक्रमानंतर भाविकांना भोजनाचा



महाप्रसाद होणार आहे. रामभक्ती, नैतिक मूल्ये आणि अध्यात्मिक ज्ञानाचा अमूल्य ठेवा मिळत आहे. या कथेमुळे उपस्थितांना जीवनात सदाचार, संयम आणि भक्तीमार्गाचे महत्त्व पटवून दिले जात आहे.

तसेच जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज यांचे गाथा निरूपण गुरुवर्य, वैराग्यमुर्ती ह.भ.प.श्री कल्याण महाराज शेळके यांचे अमृतवाणी मधुन अभंगरूपी विचारसंपदेवर आधारित गाथा निरूपण दररोज सादर होत असून त्यातून भक्तांना जीवनाचे खरे तत्त्वज्ञान, समाजप्रबोधन आणि नामस्मरणाची प्रेरणा मिळत आहे. अभंग, कीर्तन आणि प्रवचनांच्या माध्यमातून भक्तिरसाची अविरत गंगा येथे वाहताना दिसत आहे.

रामायण मधील लक्ष्मण शक्तीचाकार्यक्रम दिनांक २/४/२०२६ वार गुरुवार या दिवशी होत आहे.त्यासोबत जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज यांचे गाथा निरूपण अखंड चालु आहे

सदर कार्यक्रमामुळे परिसरात एकात्मता, श्रद्धा आणि भक्तीभाव अधिक दृढ होत असून लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण या सोहळ्यात सहभागी होत आहेत. बीड शहर तसेच आसपासच्या परिसरातील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भावार्थ रामायण कथा मधील लक्ष्मण शक्ती चा कार्यक्रम व हनुमान जन्मोत्सव कार्यक्रम दिनांक २/४/२०२६ वार गुरुवार होणार आहे व गाथा निरूपण यांचा लाभ घ्यावा तसेच लक्ष्मण शक्ती या पवित्र कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन श्री गंगाधर आगरकर व श्री दक्षिण मुखी हनुमान मंदिर कमिटीचे अध्यक्ष /मुख्य आयोजक श्री जगन्नाथ यमपुरे (हनुमान सेवक) यांच्या वतीने करण्यात आले आहे. भाविकांनी या पवित्र उत्सवात सहभागी होऊन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य आयोजकांकडून करण्यात आलेले आहे.

# सरकारकडून जाहीर मदत तुटपुंजी, आंबा, काजू उत्पादक शेतकऱ्यांचा व्यापक लढ्याचा निर्णय

कोल्हापूर / प्रतिनिधी


राज्य सरकारने आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना जाहीर केलेली हेक्टरी २२ हजार रुपयांची आर्थिक मदत तुटपुंजी आहे. यातून शेतकरी सावरणार नसल्याचे सांगत आंबा आणि काजू उत्पादक बागायतदारांनी एकमताने व्यापक लढा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. बागायतदार शेतकऱ्यांची मंगळवारी (दि. ३१ मार्च) स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांच्या अध्यक्षतेखालील बैठक झाली. त्यात हा निर्णय जाहीर करण्यात आला.

अवकाळी पाऊस, गारपीट, वेगाचा वारा, ढगाळ हवामान आदी नैसर्गिक आपत्तीचा आंबा, काजू पिकाला मोठा फटका बसला आहे. यामुळे यंदा उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची घोषणा नुकतीच केली. ज्यांनी फळ पीक विमा उतरवला आहे;



त्यांना हेक्टरी ४२ हजार रुपये आणि ज्यांना विमा संरक्षण नाही, अशांना २२ हजार रुपये मदत दिली जाईल, असे त्यांनी जाहीर केले. ही पण मदत अपुरी असल्याचा दावा शेतकरी संघटनेने केला आहे. एका बाजूला औषध फवारणी, खते, मजुरी आणि वाहतुकीचा खर्च लाखांच्या घरात गेला असताना, सरकार केवळ २२ हजार रुपये देऊन शेतकऱ्यांचे समाधान करू पाहत आहे. एका आंबा बागेचा वार्षिक खर्च आणि झालेले नुकसान पाहता, ही रक्कम फवारणीच्या एका हप्त्यासाठीही पुरेशी नाही. वारंवार होणाऱ्या नुकसानीमुळे कोकणातील शेतकरी आज कर्जाच्या जाळ्यात अडकला जात आहे. अशा परिस्थितीत सरकारने जाहीर केलेली ही मदत शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत असल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी केला आहे. आंबा व काजू पीकविम्यात कंपन्याकडून शेतकऱ्यांची लुबाडणूक सुरु आहे. कर्जमाफीमध्येही निकष आणि अटी घालून शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवले जात आहे. यामुळे मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनासाठी सर्व शेतकऱ्यांना सहभागी करून घेतले जाणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## जनावरांच्या खुरांचे आजार अन् उपाययोजना



खुरांवर भेगा पडतात. भेगा उभ्या आणि आडव्या असतात. २) सडलेले खूर : दोन खुरांच्या मध्यभागी जखम होते. त्या जखमेतून घाण वास येणारा स्त्राव येतो. जनावरांना चालताना वेदना होतात आणि ते लंगडतात. अस्वच्छ गोठा, जनावरे नेहमी चिखलात बांधणे, पाणथळ जमिनीवर जनावरे चारायला नेणे यामुळे हा आजार होतो. हा आजार संसर्गजन्य असून एका जनावरांपासून दुसऱ्या जनावरांना होऊ शकतो. ३) खुरांमध्ये पू भरणे : मऊ झालेल्या खुरांमध्ये टोकदार वस्तू शिरल्यास खुराला जखम होऊन जंतुसंसर्ग होतो. सडलेले खूर या आजारावर लगेच उपचार केला नाही तर खुरांमध्ये पू भरतो. ४) खुराच्या तळव्यावरील अल्सर : जनावरांवर कामाचा अति ताण, अति व्यायाम, जास्त अंतर पायी चालवणे, गरम जमिनीवर जास्त काळासाठी चालवणे, बसण्याची जागा कडक असणे, अशा विविध कारणांमुळे खुराच्या तळव्यावर अल्सर होतात. ५) खुराला छिद्र पडणे : टोकदार दगड, खिळा, काटा किंवा वायर यामुळे खुराला छिद्र पडते. त्यामुळे जंतुसंसर्ग होऊन जनावरे लंगडतात. ६) दोन खुरांमधील खाज : विविध सूक्ष्मजीवांमुळे जनावरांच्या दोन खुरांमध्ये खाज येते. ७) दोन खुरांमधील गाठ : काही जनावरांमध्ये दोन खुरांमध्ये गाठ आढळते. ८) लॅमिनायटिस : पशुखाद्यातील जास्त प्रमाणात वापरलेली कडधान्ये खुराला होणाऱ्या जंतुसंसर्गास कारणीभूत ठरतात. संसर्गजन्य आजारामध्ये जंतू शरीरामध्ये विष तयार करतात. कमी काम किंवा जास्त काम, प्रसूतीनंतर शरीरात होणारे संप्रेरकांचे बदल लॅमिनायटीस या आजारास कारणीभूत ठरतात.

प्रतिबंधात्मक उपाय :

१) दुधाळ जनावरांना दिवसभरात १० ते १४ तास आराम द्यावा. २) जनावरांना कामाचा अति ताण देणे आणि जास्त व्यायाम टाळावा. ३) अधिक काळासाठी जनावरांना उभे राहाणे टाळावे. ४) जनावरांना योग्य व्यायाम द्यावा. ५) जनावरांचा गोठा नेहमी कोरडा आणि स्वच्छ असावा. ६) गोठ्यात कमी जागेत जास्त जनावरे बांधू नयेत. प्रत्येक जनावराला योग्य जागा मिळेल याची काळजी घ्यावी. ७) आजारी आणि लंगडणाऱ्या जनावरांना मऊ जमिनीवर ठेवावे. ८) वर्षातून दोन वेळेस न चुकता खुरांची साळणी करावी. ९) पशुखाद्यात बदल करत असताना तो अचानक न करता हळूहळू करावा. १०) पशुखाद्यात कडधान्ये एकाच वेळी जास्त प्रमाणात न देता दिवसातून दोन वेळेस विभागून द्यावीत. ११) अति बारीक केलेला चारा किंवा कडधान्ये जास्त प्रमाणात खाद्यामध्ये देऊ नयेत. १२) पशुखाद्यात जीवनसत्त्व अ, इ, बायोटिन, जस्त,तांबे, मँगेनीज,कोबाल्ट यांचा समावेश असावा. या खनिजांमुळे खुरांचे आरोग्य चांगले राहाते. १३) खूर सडलेल्या जनावरांना त्वरित वेगळे करावे. गोठा पूर्णपणे निर्जंतुक करून घ्यावा. १४) खूर मऊ झालेल्या ठिकाणी पशूतज्ज्ञांच्या सल्ल्याने जंतुनाशक मलम लावावे. १५) खुरांचा आजार असलेल्या जनावरांचे पाय ५ टक्के कॉपर सल्फेटच्या द्रावणाने स्वच्छ धुऊन घ्यावेत.

## जनावरांच्या चाऱ्यावर युरिया प्रक्रिया; फायदे आणि पद्धत

उन्हाळ्यात पशुंची विशेष काळजी घ्यावी लागते. यात चारा हा महत्त्वाचा घटक आहे. परंतु सध्या महाराष्ट्रात पाणी टंचाई आणि चारा टंचाईमुळे शेतकरी हैराण आहेत. त्यामुळे जनावरांचा चारा कसा पौष्टिक करता येईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जनावरांच्या चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करणे हा एक चांगला उपाय आहे. यामुळे चाऱ्याची पौष्टिकता तर वाढतेच शिवाय शेतकर्यांना खर्च सुद्धा कमी येतो.चाऱ्यावर युरिया प्रक्रिया का करावी? बरेच पशुपालक चारा टंचाईमुळे जनावरांच्या आहारात गव्हाचा पेंढा, भात पेंढा, सोयाबीन भुसकट यासारख्या दुय्यम घटकांचा जास्त वापर करतात. निकृष्ट चाऱ्यामध्ये कर्बोदकांच प्रमाण कमी आणि तंतुमय पदार्थ जास्त असतात. तसेच प्रथिने अत्यल्प असतात, त्यामुळे ती पचण्यास कठीण जातात. त्यामुळे आहाराची पौष्टिकता वाढवण्यासाठी युरिया प्रक्रिया महत्त्वाची ठरते.

युरिया प्रक्रियेचे फायदे : युरियामध्ये नत्र म्हणजेच नायट्रोजनचे प्रमाण ४६ टक्के असते म्हणून युरिया हा नत्राचा अतिशय सहज व नियमितपणे उपलब्ध होणारा स्रोत आहे. युरीया प्रक्रियेमुळे चाऱ्याची पचनक्षमता वाढते. युरिया प्रक्रिया केलेल्या चाऱ्याची चव बदलते, नत्राचे प्रमाण वाढते. त्यामुळे जनावरे चारा आवडीने खातात.

युरिया प्रक्रियेची योग्य पद्धत : गव्हाचा पेंढा, भाताचा पेंढा, उसाचे पाचट इ. चा आपण युरिया प्रक्रियेसाठी वापर करू शकतो. प्रति १०० किलो चाऱ्याच्या



प्रक्रियेसाठी ४ किलो युरिया ४० लिटर पाण्यामध्ये चांगला मिसळून घ्यावा. त्यानंतर तयार झालेल्या द्रावणात एक किलो मीठ मिसळून एकजीव करावे. सावलीत कोरड्या जमिनीवर पोते आंथरुन कुट्टी केलेला चारा एकसारखा पसरून घ्यावा. साधारणतः ६ इंच इतका चाऱ्याचा थर करावा. पसरलेल्या चाऱ्यावर झारीच्या सहाय्याने तयार केलेले मिश्रण शिंपडावे आणि चारा हलवून एकजीव करून घ्यावा. अशा प्रकारे एकावर एक थर देऊन त्यात युरिया मिश्रण मिसळून घ्यावे. चाऱ्यावर दाब देऊन चाऱ्यातील जास्तीची हवा काढून घ्यावी. ताडपत्री किंवा प्लॅस्टिक कागदाने चारा हवाबंद करून झाकून टाकावा. २१ दिवस हा चारा हवाबंद ठेवावा, कारण यावर व्यवस्थित युरिया प्रक्रिया होते. २१ दिवसानंतरच हा चारा उघडावा.

चारा जनावरांना केव्हा खायला द्यावा : युरिया प्रक्रियायुक्त चारा जनावरांना खायला देण्यापूर्वी २- ३ तास अगोदर चारा मोकळ्या हवेत ठेवावा. जेणेकरून त्यामधील अमोनिया गॅस हवेमध्ये उडून जाईल. राहिलेला चारा त्यानंतर पहिल्यासारखा हवाबंद करून ठेवावा. सरूवातीला जनावरांच्या आहारात चारा थोड्या थोड्या प्रमाणात समाविष्ट करून हळूहळू मात्रा वाढवत न्यावी. ६ महिन्यापेक्षा कमी वयाच्या वासरांमध्ये आणि रवंथ न करणाऱ्या जनावरांना हा चारा देऊ नये.


काळजी आणि सूचना : जनावराच्या आहारात युरियाचा प्रमाणाबाहेर वापर झाला तर युरियाची विषबाधा होण्याची शक्यता असते. यामुळे जनावर दगावण्याची देखील शक्यता असते. जनावरांमध्ये अमोनियाचे प्रमाण १ मिलीग्रॅम प्रति १०० मिली रक्तापेक्षा जास्त झाले तर विषबाधा होते. गायी-म्हशीमध्ये ११६ ग्रॅम आणि मेंढीमध्ये १० ग्रॅमपेक्षा जास्त युरिया खाण्यात आला तर वेगाने जास्तीचा अमोनिया तयार होतो जो विषबाधेसाठी कारणीभूत ठरतो. म्हणून निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करताना ती अतिशय काळजीपूर्वक करावी लागते.

## भाजीपाला पिकातून चांगले उत्पादन मिळवण्यासाठी 'रिले क्रॉपिंग'पद्धतीचा अवलंब!

भाजीपाला लागवडीच्या वेगवेगळ्या पद्धतीद्वारे शेतकरी आपले उत्पन्न वाढवू शकतात. यातीलच एक पद्धती आहे रिले क्रॉपिंग. शेतकरी भाजीपाला पिकांचे चांगले उत्पादन मिळविण्यासाठी रिले क्रॉपिंग पद्धतीचा अवलंब करू शकतात. रिले क्रॉपिंग सिस्टीम हे एक तंत्र आहे ज्याद्वारे एकाच जमिनीवर वेगवेगळ्या भाज्यांची लागवड करता येते. हे एक खास शेती तंत्र आहे ज्याचा अवलंब करून शेतकरी अधिक उत्पादनासोबतच उत्पन्न वाढवू शकतात. विशेष म्हणजे यामध्ये मागील पीक काढण्यापूर्वी पुढील पीक पेरले जाते.

रिले क्रॉपिंग सिस्टम तंत्रज्ञान काय : रिले क्रॉपिंग सिस्टीम ही एक प्रणाली किंवा तंत्र आहे ज्यामध्ये एका शेतात एक पीक लावले जाते, तर मागील पिकातील उर्वरित ओलावा आणि पोषक तत्वांचा फायदा घेण्यासाठी त्याच शेतात दुसरे पीक नंतर लावले जाते. यामध्ये पहिले पीक काढण्यापूर्वी दुसरे पीक पेरले जाते. त्यामुळे पहिल्या पिकातील ओलावा दुसऱ्या पिकात जातो त्यामुळे सिंचनाची कमी गरज भासते, म्हणजेच कमी सिंचनात जास्त पिकांना या पद्धतीचा फायदा होऊ शकतो. जमीन आणि संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आणि उत्पादन वाढवण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरू शकते.

रिले क्रॉपिंग सिस्टम तंत्रज्ञानाचे फायदे : भाजीपाल्याचे बहुपिक घेतल्याने जास्त उत्पादन मिळते. बहुपीक शेतीमुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढू शकते. या तंत्रज्ञानाचा अवलंब करून वर्षभर रोजगार मिळू शकतो म्हणजेच वर्षभर पैसा मिळवता येतो. मोठ्या प्रमाणात खताची आवश्यकता नसते.



खताचा वापर संतुलित प्रमाणात केला जातो. पीक फेरपालटद्वारे जमिनीचे आरोग्य राखता येते. पाण्याच्या बचतीबरोबरच जमिनीची सुपीकताही राखता येते. या तंत्राने चांगले उत्पादन मिळू शकते, तथापि, पिकाचे चांगले उत्पादन हे जातीची निवड, योग्य पेरणीची पद्धत, संसाधनांचा योग्य वापर, कीड व्यवस्थापन, वेळेवर काढणी या गोष्टींवर अवलंबून असते.

या तंत्राने या भाज्यांची लागवड करता येते : बहुपीक शेती अंतर्गत, रिले क्रॉपिंग तंत्राचा वापर करून अनेक प्रकारच्या भाज्या पेरल्या जाऊ शकतात. यामध्ये कोणते पीक कोणासोबत पेरणे चांगले आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे जेणेकरून या तंत्राचा जास्तीत जास्त फायदा मिळू शकेल.

काकडीसह मिरचीची लागवड : बहुपिक शेतीत काकडींसोबत मिरचीची लागवड करता येते. यामध्ये रिले क्रॉपिंग तंत्राचा वापर करून नोव्हेंबर ते मार्च आणि फेब्रुवारी ते ऑक्टोबर अशी दोनदा पेरणी केली जाते. मिरचीची पेरणी फेब्रुवारीमध्ये शेताच्या बांधावर केली जाते.

मटारसह दुधीभोपळा लागवड : या तंत्रात नोव्हेंबर ते एप्रिल आणि फेब्रुवारी ते ऑक्टोबर या कालावधीत शेती केली जाते. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हिवाळ्यात दुधीभोपळ्याची रोपवाटिका प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये तयार करावी आणि ती फेब्रुवारीमध्ये तयार केलेल्या बेडमध्ये २.५ मीटर ४५ सें.मी. अंतरावर दोन्ही बाजूला लागवड करावी.

काकडी आणि घोसाळे लागवड : या तंत्राने नोव्हेंबर ते एप्रिल या कालावधीत काकडी आणि घोसाळ्याची लागवड केली जाते. याशिवाय मार्च ते ऑक्टोबर दरम्यानही लागवड करता येते. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की घोसाळ्याची पेरणी किंवा रोपण मार्चमध्ये ३ मीटर अंतरावर करावे.

बटाटा-कांदा-हिरवळीचे खत लागवड : यांची लागवड सप्टेंबर ते डिसेंबर, डिसेंबर आणि जून-जुलैमध्ये करता येते.

बटाटा-उशिरा लागवड फुलकोबी-मिरचीची लागवड : यांची लागवड ऑक्टोबर ते डिसेंबर, डिसेंबर ते मार्च आणि मार्च ते ऑक्टोबर या कालावधीत करता येते.

या पिकांची रिले क्रॉपिंग करू नये : अशी अनेक पिके आहेत ज्यांची एकत्र पेरणी करू नये कारण अशाच प्रकारच्या भाज्या कीटक किंवा रोगांना संवेदनशील असतात. ते एकत्र घेतल्याने पिकाचे कीड व रोगांमुळे नुकसान होण्याची शक्यता जास्त असते. उदाहरणार्थ, पीक पद्धतीमध्ये टोमॅटो आणि मिरची एकत्र पेरता कामा नये.

या पिकांची एकत्रित लागवड केल्यास फायदा होतो : उथळ मुळे असलेल्या भाज्या नेहमी खोलवर रुजलेल्या भाज्यांनंतर लावल्या पाहिजेत जेणेकरुन ते मातीच्या सर्व थरांमधील पोषक द्रव्ये शोषून घेतील. उदाहरणार्थ, मटार आणि सोयाबीन यांसारख्या शेंगांची लागवड करणे खूप फायदेशीर ठरू शकते कारण ही पिके वातावरणातील नायट्रोजन शोषून घेतात आणि ते जमिनीत साठवून ठेवतात ज्यामुळे इतर वर्गातील पिकांना फायदा होतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६१ : प्रिन्स सेसी या शास्त्रज्ञाने प्रथमच दुर्बिणीसाठी टेलिस्कोप ही संज्ञा वापरली.

१६६५ : सुप्रसिद्ध पुरंदरच्या वेढ्यामधे दिलेरखान पठाणने वज्रमाळ किल्ला जिंकला.

१७३६ : चिमाजीअप्पांनी मोघल बादशहाचा हस्तक जंजिरा येथील सिद्दीसाताचा पराभव करुन मराठी सत्तेचा दरारा बसविला.

१८६५ : जॉन विल्कस बूथने अब्राहम लिंकनवर गोळी झाडली. लिंकन दुसर्या दिवशी मृत्यू पावला.

१९१२ : आर.एम.एस. टायटॅनिकची हिमनगाशी टक्कर. बोटीला भगदाड पडून बुडु लागली.

१९४४ : मुंबईच्या बंदरात उभ्या असलेल्या बोटीवर महाभयानक विस्फोट. ३०० ठार. त्याकाळच्या २ कोटी पाउंडचे नुकसान.

१९४४ : मुंबई गोदीत उभ्या असलेल्या 'फोर्ट स्टिकिन' या मालवाहू जहाजावर दुपारी ४ वाजुन ५ मिनिटांनी भीषण स्फोट होऊन ३०० जण ठार झाले आणि (त्याकाळच्या) सुमारे २ कोटि पौंडा इतके आर्थिक नुकसान झाले.

१९८६ : बांगलादेशमध्ये १ किलो वजनाच्या अतिप्रचंड गारांचा वर्षाव. ९२ ठार. गारांच्या वजनाचा हा विक्रम अजुन अबाधित आहे.

१९९५ : टेबल टेनिसमधे सलग ६,६७० रॅलीज करण्याचा जागतिक विक्रम डॉ. रमेश बाबू यांनी पुण्यात नोंदवला.

२००८ : भारतातील कोलकत्ता व बांगलादेशाची राजधानी ढाका या दोन देशादरम्यान रेल्वे सेवा सुरु करण्यात आली.

२०१० : पश्चिम बंगाल, उडीसा, झारखंड आणि बिहार राज्यात आलेल्या चक्रवर्ती वादळामुळे सुमारे १२३ लोकांचे निधन झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२९ : क्रिस्टियन हायगेन्स डच गणितज्ञ, खगोलविद्? आणि पदार्थवैज्ञानिक, लंबकाच्या घड्याळाचा शोध (मृत्यू: ८ जुलै १६९५)

१६७५ : छत्रपती शिवाजी महाराज यांचे धाकटे पुत्र छत्रपती राजाराम भोसले यांच्या दुसऱ्या पत्नी राणी ताराबाई भोसले यांचा जन्मदिन.

१८३३ : व्हिक्टोरिया क्रॉसचे प्राप्तकर्ता रॉस लोव्हिस मंगल्स व्हीसी यांचा जन्मदिन.

१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे खंदे नेते, अस्पृश्य समजल्या जाणार्या जातितील पहिले मॅट्रिक व पहिले पदवीधर, इंग्लंडमध्ये वकिलीतील बॅरिस्टरची परीक्षा दिली आणि अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. (मृत्यू: ६ डिसेंबर १९५६)

१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार.

१८९८ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकारमधील प्रसिद्धी व प्रचार प्रमुख सुब्बीर अप्पादुराई यांचा जन्मदिन.

१९०७ : भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे प्रारंभिक नेते व माजी सरचिटणीस पूरणचंद जोशी यांचा जन्मदिन.

१९१४ : शांता हुबळीकर अभिनेत्री (मृत्यू: १७ जुलै १९९२)

१९१९ : शमशाद बेगम पार्श्वगायिका (मृत्यू: २३ एप्रिल २०१३)

१९२२ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९८९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (मृत्यू: १८ जून २००९ सॅन अन्सेल्मो, कॅलिफोर्निया, यू. एस. ए.)

१९२७ : द. मा. मिरासदार विनोदी लेखक (मृत्यू: )

१९३३ : सर्जनशील कला अकादमीचे संस्थापक-प्राचार्य अनिल कुमार दत्ता यांचा जन्मदिन.

१९४२ : मार्गारेट अल्वा केंद्रीय मंत्री व राजस्थानच्या राज्यपाल

१९४३ : रामदास फुटाणे वात्रटिकाकार

१९५७ : भारतीय मल्याळम स्त्रीवादी लेखिका आणि नाटककार के. सरस्वती अम्मा यांचा जन्मदिन.

१९५७ : भारतीय अवकाश वैज्ञानिक आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष तसचं, विक्रम साराभाई स्पेस सेंटर आणि लिक्विड प्रोपल्शन सिस्टम सेंटरचे माजी संचालक कैलासावादिव शिवन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५० : भारतीय तत्त्ववेत्ते योगी रमण महर्षी तथा वेंकटरमण अय्यर समाधिस्थ झाले. चैत्र व. १२ शके १७८३ (जन्म: ३० डिसेंबर १८७९)

१९६२ : सर मोक्षगुंडम्? विश्वेश्वरैया, भारतीय अभियंता.

१९६२ : भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या अभियंते, विद्वान, मुत्सद्दी आणि मैसूर संस्थानचे दिवाण

१९६३ : केदारनाथ पांडे तथा राहूल सांकृतायन इतिहासकार (जन्म: ९ एप्रिल १८९३)

१९९७ : चंदू पारखी चित्रपट आणि नाट्य अभिनेते (जन्म:)

१९९८ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, छायाचित्रकार व पटकथालेखक नितीन बोस यांचे निधन.

२०१३ : राम प्रसाद गोएंका उद्योगपती (जन्म: १ मार्च १९३०)

## ब्रॉयलर कोंबड्यांचे व्यवस्थापन

उष्णतेच्या ताणामुळे ब्रॉयलर कोंबड्यांच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. कोंबड्यांच्या व्यवस्थापनासाठी १८ ते २८ अंश सेल्सिअस हे योग्य तापमान आहे. ३० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानामध्ये कोंबड्यांमध्ये उष्णतेचा ताण सुरू होतो.

शेड व्यवस्थापन :शेडमध्ये फॉगर्स आणि कूलर सिस्टिमच्या आधारे तापमान नियंत्रण करावे.

शेडमध्ये थेट सूर्यप्रकाश येऊ देऊ नये. भाताच्या पेंढ्या किंवा ऊस पाचटाचे छतावर आच्छादन केल्याने शेडमधील तापमान कमी होईल. प्रकाश परावर्तित होण्यासाठी छताला पांढरा रंग लावावा. शेडभोवती उंच फांद्यांची झाडे लावल्याने तापमान कमी होऊ शकते.पाणी व्यवस्थापन :कोंबड्यांना भरपूर स्वच्छ आणि थंड पाण्याचा पुरवठा करावा. संसर्ग नियंत्रित करण्यासाठी पिण्याच्या पाण्याची सातत्याने तपासणी करावी. पाण्याच्या टाक्या ओल्या गोणपाटाने झाकून ठेवाव्यात. पाणी पिण्याची वारंवारता वाढवावी. पाण्याची पाइपलाइन ओल्या कापडाने झाकून ठेवावी.आहार व्यवस्थापन :कोंबड्यांना सकाळी आणि संध्याकाळी खाद्य द्यावे. जीवनसत्त्व क, इ, बी २, बी ६, बी १२ आणि ट्रेस खनिजे यासारखा पूरक आहार द्यावा. २० ते ३० टक्के अतिरिक्त जीवनसत्त्वे आणि ट्रेस खनिजे आहारात द्यावीत. कोंबड्यांना पोषक आहार दिल्याने त्यांची कार्यक्षमता सुधारते. पेलेटयुक्त खाद्य द्यावे.

# आशिया चषक तिरंदाजी स्पर्धेत तेजल साळवेने पटकावली दोन पदके

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले कौतुक

जालना। प्रतिनिधी

एशिया कप वर्ल्ड रँकिंग आर्चरी (स्टेज-१) स्पर्धेत तेजल साळवेने मिळवलेले हे यश केवळ तिचे वैयक्तिक यश नसून संपूर्ण जालना जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. तिची मेहनत, शिस्त आणि जिद्द आजच्या उदयोन्मुख खेळाडूंसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल. जिल्हा प्रशासन जिल्ह्यातील प्रत्येक गुणवंत खेळाडू आणि विद्यार्थ्याला सहकार्य करण्यास कटिबद्ध आहे, असे गौरवोद्गार जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी काढले. बँकॉक (थायलंड) येथे संपन्न झालेल्या एशिया कप वर्ल्ड रँकिंग आर्चरी (स्टेज-१) स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत जालन्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावणाऱ्या तेजल राजेंद्र साळवे हिचा आज जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष सत्कार करण्यात आला.



तेजलने या प्रतिष्ठित स्पर्धेत आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत वैयक्तिक कंपाउंड प्रकारात कांस्यपदक आणि भारतीय महिला संघाचे प्रतिनिधित्व करताना रौप्यपदक अशी दोन पदके पटकावली आहेत. तिच्या या कामगिरीमुळे जागतिक तिरंदाजी क्रमवारीत जिल्ह्याची आणि देशाची मान अभिमानाने उंचावली आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी तेजलच्या यशाचे कौतुक करत तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच भेटीदरम्यान जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी तेजलचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी तेजलसोबत तिचे वडील राजेंद्र साळवे आणि तिचे मार्गदर्शक आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक प्रकाश दुसेजा उपस्थित होते. यावेळी बोलताना तेजलने जिल्हा प्रशासनाकडून मिळालेल्या सातत्यपूर्ण पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रशासनाच्या प्रोत्साहनामुळेच मला आंतरराष्ट्रीय स्तरावर निश्चिंतपणे खेळता आले आणि हे यश संपादन करता आले, अशा भावना तिने व्यक्त केल्या. तसेच आगामी स्पर्धांमध्येही अशीच कामगिरी करून देशासाठी सुवर्णपदक जिंकण्याचा मानस तेजलने यावेळी बोलून दाखवला.

## अवकाळी पावसात वीज कोसळून दोन तरुण जागीच मृत्यू तर एक गंभीर जखमी



जालना। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील महाकाळा येथील गोविंद प्रल्हाद लहाने वय २१ वर्ष, आदित्य दगडू बेंद्रे वय २० वर्ष हे दोन तरुण अवकाळी पाऊस सुरू झाल्यामुळे लिंबाच्या झाडाखाली थांबले असता लिंबाच्या झाडावर वीज कोसळून दोन तरुणाचा जागेवरच मृत्यू झाला तर एक जण गंभीर भाजला आहे.

ही घटना महाकाळा ते साष्ट पिंपळगाव रोडवरील नाथनगर वस्ती या ठिकाणी घडली या दुर्दैवी घटनेमुळे महाकाळा गावावर शोककळा पसरली आहे. घटनेची माहिती कळताच जिल्हा प्रशासन यांनी तत्काळ घटनेस्थळी जाऊन घटनेची माहिती घेतली व सदरील घटनेची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

अशा अवकाळी पावसापासून नागरिकांनी सतर्क रहावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## सहज सोलार कंपनीकडून शेतकऱ्याला पंप देण्यास टाळाटाळ

### सहज सोलार कंपनीची हुकूमशाही

मंठा। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या मागेल त्याला सोलार योजनेअंतर्गत सोलार पंपासाठी ठेंगेवडगाव ता. मंठा येथील शेतकरी लक्ष्मीबाई आप्पाराव विरकर या पात्र ठरल्या होत्या. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून शेतकरी लक्ष्मीबाई आप्पाराव विरकर यांना १४०८८५०७८६ हा वर्क ऑर्डर क्रमांक १२ जानेवारी २०२६ रोजी मिळाला. वीज वितरण कंपनीने संबंधित शेतकऱ्याला सौर पंप देण्यासाठी सहज सोलार लिमिटेड या कंपनीला आदेशित केले.

मागेल त्याला सोलर पंप योजनेसाठी लक्ष्मीबाई आप्पाराव विरकर यांनी ३२०७५ /-रुपयाचा भरणाही केला मात्र सहज सोलार कंपनी कडून पंप देण्यास टाळाटाळ केली जात असून अनेक वेळा कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सुद्धा प्रतिसाद मिळत नाही.या कंपनीने तात्काळ सौर पंप बसवून द्यावा अन्यथा न्यायालयात दाद मागावी लागेल असा इशारा शेतकरी लक्ष्मीबाई आप्पाराव विरकर यांनी दिला आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून आ. राजेश राठोड यांच्या कार्याचे कौतुक

मंठा। प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषद सदस्य आ. राजेश राठोड यांच्या विधान परिषद सदस्यत्वाचा कार्यकाळ संपत असल्याने सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सभापती राम शिंदे यांनी आ. राजेश राठोड यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी सभागृहाचे सर्व सदस्य आणि सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आ. राठोड यांच्या निरोप समारंभात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आ. राजेश राठोड यांनी मराठवाड्यातील शैक्षणिक, सहकार, कृषी अशा वेगवेगळ्या क्षेत्रात चांगले काम केले. महाविद्यालयीन जीवनापासूनच उत्तम संघटक म्हणून




काम करत असताना त्यांनी विविध क्षेत्रात आणि संघटनेत आपला प्रभाव टाकला. जिल्हा परिषदेपासून सुरू झालेल्या राजकीय कारकिर्दीमुळे ते वरिष्ठ सभागृहात पोहोचले. बंजारा समाजाचा आक्रमक नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते तसेच मराठवाडा भूषण पुरस्काराने ही त्यांचा गौरव झाला. यापुढेही चांगले राजकीय नेतृत्व करण्यासाठी त्यांना संधी मिळावी यासाठी शुभेच्छा दिल्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आ. राठोड हे वरिष्ठ सभागृहातील शांत व संयमी व्यक्तिमत्व असून त्यांनी वंचित व उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी वेळोवेळी प्रकाश टाकला. स्थानिक पातळीवरील विकास कामे व पायाभूत सुविधा मिळण्यासाठी त्यांनी शासन पातळीवर सभागृहाच्या माध्यमातून प्रश्न मांडले. त्यांच्या कार्याचे योगदान, त्यांचा सुस्वभाव कायम सभागृहाच्या स्मरणात राहील असा गौरवपूर्ण उल्लेख केला. सभापती राम शिंदे म्हणाले की, आमदार राजेश राठोड यांनी विधिमंडळाचे विविध समित्यावर उत्तम काम केले आहे, त्यांनी वंचित, भटके विमुक्त बांधवांसाठी विविध योजना राबविण्यासंदर्भात अभ्यासपूर्ण पद्धतीने सभागृहात बाजू मांडली व प्रश्न सोडविले असे सांगितले.

आ. राठोड यांनी सभागृहात विकास कामाचा षटकार लगावला. मंठा येथे परिवहन महामंडळाचा डेपो, उपजिल्हा रुग्णालय, ट्रॉमाकेअर व निवासस्थानाच्या इमारतीसाठी निधी, मंठा येथे पोलीस मिलिटरी प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे, लोअर दुधना प्रकल्पातून उपसा जलसिंचन त्याचप्रमाणे पूर्णा नदीवर बॅरेजेस बांधून उपसा जलसिंचन, मंठा व परतुर येथे हस्तकला केंद्र स्थापन करणे, आष्टी येथे नगरपंचायत स्थापन करणे तसेच वाटूर, सेवली, आष्टी आणि तळणी या नवीन तालुक्याच्या निर्मितीसाठी प्रस्ताव देणे अशा विविध कामाचे षटकार आ. राजेश राठोड यांनी अधिवेशनात लगावले.

## कैलास गोरंट्याल यांची उच्च न्यायालयाने याचिका फेटाळले

जालना। प्रतिनिधी

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे शिवसेनेचे अर्जुन खोतकर १,०४,००० मते मिळवून विजयी झाले होते. त्यांनी काँग्रेसच्या कैलास गोरंट्याल यांचा ३१,००० मतांनी पराभव केला होता. खोतकर यांच्या निवडणुकीला कैलास गोरंट्याल यांनी मा. उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. हे होते याचिकेतले मुद्दे : खोतकर हे जालना बाजार समितीचे मुख्य प्रशासक हे लाभाचे पद धारण करीत असल्याने ते विधानसभा निवडणूक लढवण्यास अपात्र आहेत;





खोतकर यांनी नामनिर्देशन पत्रासोबत दाखल केलेले शपथपत्र विहित नमुन्यात नव्हते; निवडणूक आयोगाने नियमांचे उल्लंघन करून निवडणूक घेतली ज्याने खोतकर यांना फायदा झाला; या कारणांमुळे खोतकर यांची निवडणूक अवैध असून त्यांची आमदारकी रद्द करावी अशी विनंती गोरंट्याल यांनी मा. उच्च न्यायालयात केली होती. या याचिकेत खोतकर यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार अर्ज करून गोरंट्याल यांनी उपस्थित केलेल्या एकाही मुद्द्यात तथ्य नाही त्यामुळे त्यांची याचिका प्राथमिक टप्प्यावर च रद्द करावी अशी विनंती मा. न्यायालयास केली होती. आपल्या अर्जात खोतकर यांनी खालील मुद्दे मांडले होते. बाजार समिती ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने तीत धारण केलेले कुठलेही पद हे राज्यघटनेच्या अनुच्छेद १९१ नुसार लाभाच्या पदाच्या व्याख्येत येत नाही; खोतकर यांची बाजू मांडताना जेष्ठ वकील संजीव देशपांडे यांनी संविधान सभेतील चर्चेचा आधार घेत न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की एखाद्या व्यक्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेतील धारण केलेले पद हे त्या व्यक्तीस विधानसभा निवडणूक लढविण्यास अपात्र करत नाही. अशी अपात्रता केवळ राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीसाठी असते. तसेच खोतकर यांचे नामनिर्देशन पत्रासोबतचे शपथपत्र विहित नमुन्यात असून त्यांनी संपूर्ण माहिती जनतेला दिलेली आहे; निवडणूक आयोगावर गोरंट्याल यांनी केलेले आरोप निराधार व बिनबुडाचे असून त्यांच्या पुष्ट्यर्थ त्यांनी एकही पुरावा दिलेला नाही. मा. उच्च न्यायालयाने सुनावणीअंती खोतकर यांचा अर्ज मंजूर करून गोरंट्याल यांची याचिका फेटाळून लावली. खोतकर यांचे तर्फे जेष्ठ वकील संजीव देशपांडे यांनी बाजू मांडली व त्यांना ॲड. सुबोध शाह व ॲड प्रतीक भोसले यांनी सहकार्य केले.

## पाकिस्तानी सौंदर्य प्रसाधनांची विक्री करणाऱ्या तीन व्यापाऱ्यांना बेड्या

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

बंदी असलेल्या पाकिस्तानी सौंदर्य प्रसाधनांची शहरात खुलेआम विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सिटी चौक पोलिसांनी शहागंज, रंगारगल्ली भागातील तीन दुकानांवर छापे टाकून सुमारे ६० हजारांचे पाकिस्तानी उत्पादने जप्त केली. याप्रकरणी ग्राहकांची आणि शासनाची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली तीन व्यापाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

मोहम्मद अबरार मोहम्मद मसुयोद्दीन (२६, रा. नवाबपुरा), अंकुर अजय अग्रवाल (३५, रा. शहागंज) आणि जुमान खान मोहम्मद हनिफ खान (४८, रा. शहाबाजार) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. तिघांना न्यायलयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनवाल्याची माहिती गुन्हे शाखेचे उपायुक्त रत्नाकर नवले यांनी दिली. दुकानांतून साबणासह एकूण २८ प्रकारच्या वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. भारत सरकारने पाकिस्तानातून आयात होणाऱ्या वस्तूंवर बंदी घातली आहे. मात्र, तरीही शहरात काही न, व्यापारी बेकायदेशीररीत्या कोणत्याही बिलाशिवाय (विना पावती) पाकिस्तानी क्रीम्स आणि साबणांची विक्री करत असल्याची माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांना दिली होती. या माहितीच्या आधारे पोलिस निरीक्षक निर्मला परदेशी यांच्यासह पीए सआय संजय राठोड, मुनीर पठाण, आनंद वाहूळ, प्रवीण टेकले, मनोहर त्रिभुवन, मंगेश पंडित यांच्या पथकाने तीन दुकानांवर छापे टाकून पाकिस्तानी सौंदर्य प्रसाधने जप्त केली आहेत. यामध्ये प्रामुख्याने गोरी मल्लिका, गोल्डन पर्ल, चांदनी, फेस फ्रेश आणि नूर हर्बल यांसारख्या बंदी असलेल्या उत्पादनांचा समावेश आहे.व्यापाऱ्यांची पोलिसांकडून कसून चौकशी केली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, मुंबईमार्गे पाकिस्तानी सौंदर्य प्रसाधनाचे पार्सल शहरात आणले जात होते. गेल्या अनेक महिन्यांपासून जुन्या शहरात याची खुलेआम विक्री केली जात होती. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पोलिसांना माहिती दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

## एकात्मिक विकासासाठी अधिकाऱ्यांना गाव दत्तक देणार

धाराशिव । प्रतिनिधी

पोकरा योजनेंतर्गत जिल्ह्यातील १३८ गावांचा समावेश करण्यात आला असून या गावांचा संपूर्ण एकात्मिक विकास साधण्याचा निर्धार करण्यात आला आहे. यात युवकांना मोबाईलपासून दूर ठेवत योगा, प्राणायाम आणि सुदर्शन क्रिया शिकविण्यात येणार आहे. या सर्व उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक अधिकाऱ्याला एक गाव दत्तक देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी विद्या-चरण कडवकर यांनी केले.




शहर पोलिस स्टेशनजवळील उस्मानाबाद क्लब मैदानावर महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या ५१ व्या वर्धापन दिनानिमित्त नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पा अंतर्गत आयोजित नवतेजस्विनी महोत्सवाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. यावेळी सहायक पोलिस निरीक्षक दिनेश जाधव, महिला व बाल विकास संरक्षण अधिकारी भुजंग भोसले, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी सुखदेव चिंचोलीकर, लेखाधिकारी विजय स्वामी, राजाभाऊ शिंदे, सुरेंद्र कांबळे, बाबा शेख, तालुकास्तरीय लोक संचलित साधन केंद्राध्यक्ष निर्मला उबाळे, स्मिता पाटील, सुरेखा पाटील आदी उपस्थित होते. कडवकर म्हणाले, की दुसऱ्या टप्प्यात माविमच्या ४९ गावांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण देण्यात येणार असून युवकांचे मन, मनगट आणि मस्तिष्क वळकट करण्यासाठी प्रयत्न केले जातील. तसेच माविम मित्र म्हणून गावातील पती-पत्नींमध्ये होणाऱ्या वादांमध्ये योग्य ते समुपदेशन करून कुटुंबातील समन्वय राखण्याचे आवाहन त्यांनी केले.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी बचत गटातील महिलांनी पुढाकार घ्यावा, तसेच शेतमालाच्या पॅकिंगवर भर द्यावा. गावातील व्यसनाधीन मुलांची माहिती संकलित करून त्यांना दोन महिन्यांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येईल. त्यांच्या आवडीनुसार कंपनी, हॉटेल्स, प्लंबर, हॉस्पिटल तसेच इतर क्षेत्रांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी चिंचोलीकर यांनी केले.

सूत्रसंचालन सीएमआरसी सहव्यवस्थापक किशोर टोम्पे यांनी तर आभार विजय स्वामी यांनी मानले. महादेव पवार, श्रद्धा एडके, आकाश जोगी, निर्मला शिंदे, राजश्री ढोबळे, माया कांबळे, तालुका उपजीविका सल्लागार सिद्धांत मस्के, पांडुरंग गायकवाड, ऋषी हिंगे, संजीवनी लोंढे, आकांक्षा गायकवाड तसेच सर्व सहयोगिनी, सीआरपी, कार्यकारिणी सदस्य, माविम मित्र, स्टॉलधारक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## स्वीकृत नगरसेवकासाठी नेत्यांची मुले, बहीण-भाऊ रिंगणात

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाकडून उमेदवारी नाकारल्याने आता स्वीकृत नगरसेवक होण्यासाठी नेत्यांच्या मुलांसह भाऊ-बहिणींनी फिल्डिंग लावली आहे. दहा जागांसाठी ८० उमेदवारी अर्ज दाखल झाले असून, त्यात या सर्वांचा समावेश आहे. यामध्ये भाजपच्या १३, एमआयएमच्या ३ इच्छुकांसह शिंदेसेनेचे १५ आणि ठाकरे सेनेचे १५ जणांचा समावेश आहे. आता १ एप्रिल रोजी या अर्जाची छाननी होणार आहे.




महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत ११५ पैकी सर्वाधिक ५६ नगरसेवक हे भाजपचे विजयी झाले आहेत. त्यानंतर एमआयएमचे ३३, शिवसेनेचे १३, शिवसेना उबाठाचे ६, वंचित बहुजन आघाडीचे ४, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रत्येकी एका नगरसेवकाचा समावेश आहे. या निवडणुकीनंतर आता स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. शासनाने नव्याने घेतलेल्या निर्णयानुसार १० स्वीकृत सदस्य नियुक्त केले जाणार आहेत. संख्याबळानुसार भाजपला ५ स्वीकृत सदस्य नियुक्त करता येणार आहेत. एमआयएम या पक्षाला तीन स्वीकृत सदस्य नियुक्त करता येणार आहेत. त्यानुसार एमआयएमने तीन जणांची नावे जाहीर केली असून, त्यांनीच सोमवारी शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. शिंदे सेनेसह ठाकरे सेनेला प्रत्येकी एक स्वीकृत सदस्य मिळणार आहे. मात्र या एका जागेसाठी दोन्ही सेनेकडून प्रत्येकी १५ असे ३० इच्छुकांनी अर्ज भरले आहेत. तर भाजपकडून ५ जागांसाठी १३ इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहेत. स्वीकृत नगरसेवक पदासाठी भाजपकडून माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार डॉ. भागवत कराड यांची बहीण तथा भाजपच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा डॉ. उज्ज्वला किसनराव कराड, तसेच मुलगा तथा भाजपचे सरचिटणीस हर्षवर्धन भागवत कराड यांचा समावेश आहे. आमदार संजय केणेकर यांचे पुत्र हर्षवर्धन संजय केणेकर यांनीही अर्ज दाखल केला आहे. ठाकरे सेनेकडून माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे बंधू राजेंद्र दानवे यांचाही अर्ज आहे. यामध्ये कमलाकर जगताप, गोपाळ कुलकर्णी, आशा बिनवडे, रूपचंद वाघमारे, पुनमचंद बमने, चेतन कांबळे, गोकुळसिंग मलके या माजी नगरसेवकांचही समावेश आहे.

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**



# उमा नगरित अवतरली धाकटी पंढरी

बीड । प्रतिनिधी

टाळ-मृदंगाचा ताल... ढोल-ताशांचा गजर...हजारो कलशधारी महिलांची शिस्त....संत-महंतांचा वावर आणि मुखी हरिनामाचा गजर... अशा भक्तीमय वातावरणात श्री क्षेत्र नारायण गडच्या ७४ व्या अखंड हरिनाम नारळी सप्ताहा गेवराई तालुक्यातील उमापूर येथे सुरुवात झाली. महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांच्या हस्ते सप्ताहाची फुले समर्पित करण्यात आली. भक्तीभावाने नाहून निघालेल्या उमा नगरित धाकटी पंढरी अवतरल्याचे दिसून आले.

यावेळी उत्तराधिकारी महंत संभाजी महाराज, हभप दत्ता महाराज गिरी, हभप समाधान शर्मा महाराज, भानुदास महाराज शास्त्री. नारायण महाराज डिसले, नामदेव महाराज शेकटेकर, लक्ष्मण महाराज तकीक,





## भव्य मिरवणुकीनंतर नारायणगड सप्ताहास प्रारंभ

सिद्धेश्वर महाराज गाडे, विठ्ठल महाराज गलधर आदींसह टाळकरी, वारकरी उपस्थित होते. मंगळवारी सकाळी अकरा वाजता उमापूर गावातून महंत शिवाजी महाराज यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत छत्रपती शिवाजी महाराज व संतांची वेशभुषाकरून विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच हजारो महिला कलश घेऊन शिस्तबद्ध मिरवणूक काढण्यात आली. टाळ-मृदंग, ढोलपथक व हरिनामाचा गजर याने उमापूर गाव भक्तीमय झाले होते. मिरवणूक नंतर विनापूजन करण्यात आले व पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी संतमहंतांसह हजारो महिला-पुरुष, लहान-थोरांची उपस्थिती होती.

### महंत शिवाजी महाराजांचे हेलीकॉप्टरमधून आगमन

महंत शिवाजी महाराज यांचे उमापूर नगरित हेलीकॉप्टरमधून आगमन झाले. बाबांच्या स्वागतासाठी अवघे ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी बाबांचे स्वागत झाल्यानंतर भव्य मिरवणूक काढण्यात आली.

### रामकथेत भाविक तल्लीन

उमापूर येथील सप्ताहात हभप समाधान महाराज शर्मा हे मधूर वाणीतून रामकथा कथन करीत आहेत. पहिल्याच दिवशी या कथेत भाविक तल्लीन झाल्याचे दिसून आले.

### आज जलील महाराज यांचे कीर्तन

पहिल्या दिवशी हभप ज्ञानेश्वर महाराज पठाडे यांचे कीर्तन झाले. तर, आज बुधवारी महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार हभप जलील महाराज सय्यद यांचे कीर्तन होणार आहे. या सप्ताहात उमापूर सह परिसरातील ग्रामस्थ. तरुणांनी जोरदार नियोजन केले आहे.

## माजलगावमध्ये झोका खेळताना ९ वर्षांच्या मुलीचा दुर्दैवी अंत!

माजलगाव । प्रतिनिधी

घरात झोका खेळण्यासाठी गेलेल्या एका नऊ वर्षीय चिमुकलीचा झोक्याचा फास बसून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही हृदयद्रावक घटना माजलगाव शहरातील खंडोबा मैदान परिसरात दि ३१ मार्च मंगळवार रोजी घडली.वृंदा समीर रुद्रवार असे मृत चिमुकलीचे नाव असून,या घटनेमुळे रुद्रवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



वृंदा ही येथील ईगलवुड शाळेत इयत्ता दुसरीमध्ये शिकत होती. सुट्टीच्या दिवशी घडलेल्या या अपघाताने परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.शहरातील व्यापारी प्रदीप रुद्रवार यांचे खंडोबा मैदान परिसरात घर आहे. दि ३१ मार्च मंगळवार रोजी महावीर जयंतीची सुट्टी पान ३ वर

## परळीत गुन्हे शाखेचे मोठे कोम्बींग ऑपरेशन; दोन अट्टल चोरांना बेड्या

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील धारूर, आष्टी आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत चैनस्नॅचिंग करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेने एका धाडसी कोम्बींग ऑपरेशनमध्ये अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी एक जण ठाणे जिल्ह्यातील 'मोक्का' गुन्ह्यात फरार होता.



**मध्यरात्री घातला छापा**

स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, धारूर येथील चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी परळी येथील ईराणी गल्लीत लपले आहेत. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथके तयार करण्यात आली. २८ मार्च २०२६ च्या मध्यरात्रीपासूनच ईराणी वस्तीत पाळत पान ३ वर



बीड : शिवसेना बीड जिल्हा लोकसभा संपर्कप्रमुख पदी मनोजजी शिंदे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करून शुभेच्छा देताना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप जिल्हाप्रमुख एडवोकेट चंद्रकांत नवले जिल्हाप्रमुख सचिन मुळूक व शिवसेनेचे जिल्हा पदाधिकारी

## महादेव कसबे यांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले-डॉ.क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

महादेव कसबे यांनी प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवा बजावत शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यकाळात अनेक विद्यार्थी घडले असून त्यांनी समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असे मत नवगण शिक्षण संस्थेचे सचिव तथा भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

बीड तालुक्यातील कानडीघाट येथील नवगण शिक्षण संस्था संचलित हायस्कूलचे मुख्याध्यापक महादेव कसबे यांच्या सेवापूर्तीनिमित्त मंगळवारी गौरव सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.



यावेळी ह.भ.प. नामदेव महाराज कवडे, माजी पंचायत समिती सदस्य सुनिल झोडगे, सरपंच गोकुळ कुडके, विठ्ठल हांगे, अंबादास पवार, अशोक घुमरे, संतोष घुमरे, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, प्रशासक डॉ.व्ही.टी.देशमाने, डॉ.सुधाकर गुट्टे, मुख्याध्यापक लक्ष्मण चंदनशिव, दीपालीताई शेंडगे, शुभम कातांगळे, राजाभाऊ क्षीरसागर, प्रदीप अडागळे, इम्रान जागीरदार, पंकज शिंदे, लालासाहेब घुमरे आदींची उपस्थिती होती. दरम्यान, संस्थेच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते कसबे दाम्पत्याचा सन्मान केले. यावेळी ग्रामस्थ, विद्यार्थी, पालक व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांना मातृशोक

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा व्याकरणाचार्य ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या मातोश्री नानीबाई शेषेराव लाड (वय ९९) यांचे वृद्धापकाळाने सोमवारी (दि.३०) सायंकाळी ८ वाजता लाडेवडगाव (ता.केज) येथील राहत्या घरी निधन झाले.



मंगळवारी (दि.३१) लाडेवडगाव येथे त्यांच्या पार्थिवावर शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदायातील सद्गुरू जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संदीपान महाराज हासेगावकर, वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रमाचे मार्गदर्शक स्वामी ब्रह्मानंद महाराज, जगन्नाथ महाराज देशमुख, ज्ञानेश मिशन संस्थेचे अध्यक्ष रामकृष्ण महाराज कदम, अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे अध्यक्ष आर.के.रांजणे, तुळशीराम कराड, विठ्ठल महाराज शास्त्री, किसन महाराज पवार, पांडुरंग महाराज मुंडे, भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.प्रल्हाद ढाकणे शास्त्री, रेखाताई गुट्टे, गोदावरीताई मुंडे, अयोध्याताई केंद्रे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते ऋषिकेश आडसकर, भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत केदार, संतोष हांगे, विष्णू घुले, भाजप तालुकाध्यक्ष भगवान केदार, मधुकर आघाव, डॉ.नवनाथ घुगे यांच्यासह राजकीय, सामाजिक व वारकरी संप्रदायातील अनेक नागरिक उपस्थित होते. दरम्यान, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी भ्रमणध्वनीवरून लाड कुटुंबियांचे सांत्वन करून शोक व्यक्त केला. नानीबाई लाड यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

## प्रेम संबंधातून बदनामीच्या भीतीने तरुणाची आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

प्रेमसंबंधाच्या संशयावरून एका २३ वर्षीय तरुणाला बेदम मारहाण करून त्याच्यावर चोरीचा खोटा आळ घेतल्याची धक्कादायक घटना मांजरसुंबा परिसरात घडली आहे. या जाचातू आणि समाजात होणाऱ्या बदनामीच्या भीतीपोटी ज्ञानेश्वर तुकाराम कोकाटे या तरुणाने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. याप्रकरणी नेकनूर पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मांजरसुंबा येथील रहिवासी असलेला ज्ञानेश्वर कोकाटे याचे नेकनूर जवळील एका गावातील तरुणीशी प्रेमसंबंध होते. या प्रकरणाची कुणकुण तरुणीच्या नातेवाईकांना लागली होती. तू आमच्या घराच्या परिसरात वारंवार चकरा का मारतोस? असा जाब विचारत तरुणीच्या नातेवाईकांनी ज्ञानेश्वरला गाठले. यावेळी केवळ शाब्दिक चकमक न होता, आरोपींनी ज्ञानेश्वरला बेदम मारहाण केली. इतक्यावरच न थांबता, त्याला समाजात बदनाम करण्याच्या उद्देशाने त्याच्यावर चोरीचा खोटा आरोप देखील ठेवण्यात आला. एका तरुण मुलासाठी चारचौघात झालेली मारहाण आणि चोरीचा लागलेला कलंक हे अत्यंत मानहानीकारक ठरले.या मानसिक धक्क्यातून ज्ञानेश्वर सावरू शकला नाही. सततचा छळ आणि खोट्या आरोपांमुळे आलेल्या नैराश्यातून त्याने टोकाचे पाऊल उचलले. ज्ञानेश्वरने आविष्कार निवृत्ती रसाळ यांच्या मालकीच्या एका पत्र्याच्या शेडमध्ये जाऊन गळफास घेतला.या प्रकरणी मयत ज्ञानेश्वरचे वडील तुकाराम साहेबराव कोकाटे यांनी नेकनूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आपल्या मुलाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप त्यांनी मुलीच्या नातेवाईकांवर केला आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी वसंत उंदरे, सचीन उंदरे, अशोक उंदरे, प्रेम उंदरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून सध्या नेकनूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचीन धायगुडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## दोन हजाराच्या लाचेची मागणी करणारा पोलीस कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात!

बीड । प्रतिनिधी

बीडजिल्ह्यात लाचखोरी काही केल्या कमी होत नसल्याचे दिसत आहे. सिरसाळा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला पोलीस कॉन्स्टेबल दत्ता नागनाथ निघुल याला दोन हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी बीड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे.

तक्रारदाराचा उसाने भरलेला ट्रॅक्टर काही शेतकऱ्यांनी शेतातून बाहेर जाऊ दिला नव्हता. याबाबत तक्रारदाराने सिरसाळा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. त्यानंतर कॉन्स्टेबल दत्ता निघुल याने ट्रॅक्टर बाहेर काढून देण्यासाठी मदत केली. मात्र, ही मदत केल्यानंतर "चहापाणी"च्या नावाखाली दोन हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे.या प्रकरणाची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आल्यानंतर सापळा रचण्यात आला. त्यानुसार दत्ता निघुल पान ३ वर

## दहा वर्षे पोलिसांना गुंगारा देणारा बाबुशेठ टायरवाले अखेर जेरबंद!

आष्टी । प्रतिनिधी

मागील तब्बल दहा वर्षांपासून पोलिसांच्या डोळ्यात धूळ फेकून मोकाट फिरणारा शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले ऊर्फ बाबू सुब्रमण्यम कांबळत हा अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे.२०१६ मधील कलम ३०७ (खुनाचा प्रयत्न) सारख्या अत्यंत गंभीर गुन्ह्यात तो फरार होता. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी अत्यंत शिताफीने सापळा रचून त्याला अटक केली. आष्टी येथील न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, या अटकेमुळे राजकीय आणि गुन्हेगारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.१० वर्षांचा फरार प्रवास आणि पोलिसांची कारवाई



२०१६ साली घडलेल्या एका जीवघेण्या हल्ल्याच्या गुन्ह्यात बाबू सुब्रमण्यम कांबळत याचे नाव मुख्य आरोपी म्हणून निष्पन्न झाले होते.मात्र,गुन्हा दाखल झाल्या पासून तो पोलिसांना गुंगारा देत होता.एक-दोन महिने नव्हे, तर तब्बल एक दशक (१० वर्षे) हा आरोपी राजरोसपणे मोकाट फिरत होता.तो पोलिसांना का सापडत नव्हता? हा प्रश्न गेले अनेक दिवस संशयाचे धुके निर्माण करत होता. अखेर पोलिसांना मिळालेल्या एका खात्रीलायक गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचण्यात आला आणि बाबुशेठला बेड्या ठोकण्यात तपास यंत्रणांना यश आले.

**न्यायालयाकडून कोठडी मंजूर**

अटकेनंतर आरोपीला तातडीने आष्टी येथील न्यायालयात हजर करण्यात आले. सरकारी पक्षाचा युक्तिवाद, गुन्ह्याचे गांभीर्य आणि १० वर्षे फरार असल्याचा मुद्दा ग्राह्य धरून, न्यायालयाने आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. आता या कोठडीदरम्यान पोलीस पान ३ वर

## ईशानी जोशी ऑलिंपियाड परीक्षेत राज्यात प्रथम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

एम टी एस ऑलिंपियाड,जळगांव स्पर्धा परीक्षेत अंबाजोगाई येथील खोलेश्वरच्या (प्रगती) विद्यालयातील इयत्ता दुसरीतील विद्यार्थिनी कु. ईशानी प्रविण जोशी हिने सर्वाधिक गुण मिळवून संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा शोध घेण्यासाठी अशा परिक्षा घेतल्या जातात ईशानीने मिळवलेल्या या यशामुळे जिल्ह्याच्या शैक्षणिक वर्तुळात तिचे विशेष कौतुक होत आहे.



ईशानी ही भा.शि.प्र. संस्था संचलित खोलेश्वरच्या प्रगती विभागात शिक्षण घेत असून, तिची जिज्ञासूवृत्ती,चिकाटी आणि अभ्यासातील सातत्य यामुळे तिने अल्पावधीतच यशाचे हे उत्तुंग शिखर गाठले आहे.ईशानी ने मिळवलेले पान ३ वर

# ३५ लाखांचा निधी तुटपुंजे काम, गावकऱ्यांच्या सतर्कतेमुळे भ्रष्टाचार उघड



## सालेवडगांव-गणेशवाडी नदीवरील पुलाच्या कामात मोठा गैरप्रकार उघड

आष्टी । प्रतिनिधी

सालेवडगांव ते गणेशवाडी दरम्यान नदीवर पुल नसल्यामुळे वर्षानुवर्षे ग्रामस्थांना, विशेषतः शाळकरी मुलांना पावसाळ्यात जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत होता. या गंभीर समस्येची दखल घेत अखेर जिल्हा नियोजन समितीमार्फत ३५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. मात्र, विकासाच्या नावाखालीच भ्रष्टाचाराचा खेळ उघडकीस आला असून, ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार वेळीच थांबवण्यात आला आहे.

**निकृष्ट कामावर ग्रामस्थांचा संताप**

पुलाच्या कामाची पाहणी करताना ग्रामस्थांना सुरुवातीपासूनच कामात मोठ्या त्रुटी आढळून आल्या. वापरलेले साहित्य, बांधकामाची पद्धत आणि एकूणच दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे स्पष्ट झाले. ३५ लाखांचा प्रकल्प असताना प्रत्यक्षात केवळ ३ लाखांच्या दर्जाचे काम केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

हे काम पाहूनच संताप येतो. इतका मोठा निधी मंजूर होऊनही दर्जा इतका खालावलेला कसा? असा सवाल संतप्त नागरिकांनी उपस्थित केला.

**अधिकारी-ठेकेदार संगनमताचा संशय**

या प्रकरणात संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्यात संगनमत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जे स्पष्टपणे डोळ्यांना दिसते, ते अधिकाऱ्यांना का दिसत नाही? की जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून आर्थिक लाभ घेतला जातो? असा थेट सवालही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

**ग्रामस्थांची एकजूट; काम थांबवले**

निकृष्ट काम सहन न करता ग्रामस्थांनी एकत्र येत संबंधित काम थांबवले आणि ठेकेदारास जाब विचारला. यावेळी ठेकेदाराने काम नव्याने, योग्य दर्जात पूर्ण करण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती मिळाली आहे.

**पावसाळ्यातील जीवघेणा प्रश्न कायम**

हा पूल केवळ सोयीसाठी नव्हे, तर जीविताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. पावसाळ्यात नदीला पूर आल्यावर संपर्क पूर्णपणे तुटतो, ज्यामुळे शाळकरी मुलांचे शिक्षण, तसेच नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होते. त्यामुळे या पुलाचे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण होणे अत्यावश्यक आहे.

**वारे वा काम अन् दर्जा! – उपरोधिक प्रतिक्रिया**

पुलाच्या सध्याच्या अवस्थेकडे पाहून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून वारे वा काम अन् दर्जा! अशा उपरोधिक प्रतिक्रिया उमटत आहेत. विकासकामांच्या नावाखाली होणाऱ्या अशा प्रकारांवर कठोर कारवाईची मागणी आता जोर धरू लागली आहे.

सालेवडगांव-गणेशवाडी पुल प्रकरणाने पुन्हा एकदा स्थानिक पातळीवरील भ्रष्टाचाराचा चेहरा उघडा पाडला आहे. मात्र, यावेळी ग्रामस्थांनी दाखवलेली जागरूकता हीच खरी ताकद ठरली आहे. आता प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करणे गरजेचे आहे, अन्यथा निधी मोठा, काम खोटं हीच स्थिती कायम राहणार आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# महापौर बंगल्याच्या दुरुस्तीवर ४५ लाखांची उधळपट्टी

## निविदा न काढता काम मंजूर केल्याने महापालिकेत वाद

पुणे । प्रतिनिधी

घोले रस्त्यावरील महापौर बंगल्याच्या दुरुस्तीसाठी विनानिविदा ४५ लाख ९१ हजारांची उधळपट्टी करण्यात आली आहे. काम पूर्ण झाल्यावर संबंधित ठेकेदाराला बिल अदा करण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीत मंजुरी देण्यात आली आहे. 'तातडीची तरतूद' वापरून केवळ तीन कोटेशन मागवून काम देण्याची ही प्रक्रिया राबविण्यात आली आहे.



शिवाजीनगर येथील पुणे महापालिकेच्या महापौरांच्या निवासस्थानाच्या दुरुस्ती व देखभालीसाठी तब्बल ४५ लाख ९१ हजार ९३७ रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीमार्फत मुख्य सभेसमोर ठेवण्यात आला आहे. महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्यानंतर नवे महापौर या निवासस्थानी राहणार असल्याने नगरसचिव, मुख्य अभियंता (विद्युत) आणि भवन रचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक दुरुस्तीची कामे निश्चित केली असून, ती तातडीने सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या कामामध्ये आतील-बाहेरील रंगकाम, लाकडी साहित्यावर पॉलिश, छपराची दुरुस्ती, फर्निचर नूतनीकरण आणि स्वच्छतागृहांची दुरुस्ती यांचा समावेश आहे. सुमारे ३८.७० लाख रुपयांचे सर्वांत कमी दराचे कोटेशन धनकवडी येथील ठेकेदार मे. कमलेश सुभाष जडे यांनी दिले असून, त्यांची निवड करण्याची शिफारस करण्यात आली आहे. जीएसटी आणि इतर खर्चांसह एकूण रक्कम ४५.९१ लाखांपर्यंत जाणार आहे. 'पुणे मनपा वसाहतींची दुरुस्ती' या शीर्षकाखालील निधी वापरला जाणार आहे. या अर्थसंकल्पीय तरतुदीत सुमारे ३०० कोटी रुपये असून, त्यातील ५० टक्के रक्कम खर्च करण्यास वित्तीय समितीची मंजुरी आधीच मिळालेली आहे. मात्र, निविदा न काढता तातडीच्या तरतुदीअंतर्गत हे काम दिले जात असल्याने महापालिका वर्तुळात प्रश्न उपस्थित केले जात आहेत. भवन रचना विभागाकडून या कामासाठी कोणतीही निविदा मागविण्यात आलेली नाही. महापौर निवासस्थानाची देखभाल यापूर्वीपासून घोले रोड क्षेत्रीय कार्यालयामार्फतच केली जात असल्याने थेट कोटेशनने काम दिले जात असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. गेल्या बारा वर्षांत महापौर बंगल्यात अद्याप एकही महापौर राहण्यास गेलेले नाहीत. केवळ महापौर बंगला कार्यकर्त्यांच्या उठबैठकीसाठी वापरला जातो. त्यामुळे लाखो रुपये खर्च केल्यानंतर विद्यमान महापौर या बंगल्यात राहण्यास जाणार का? याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# बारामतीची निवडणूक बिनविरोध होऊ देणार नाही, लक्ष्मण हाकेंची भूमिका, सुनेत्रा पवारांच्या विरोधात कोण?

पुणे । प्रतिनिधी

बारामती विधानसभा पोटनिवडणूक आम्ही बिनविरोध होऊ देणार नाही ही आमची भूमिका आम्ही जाहीर केल्याचे मत ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केले. सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार कोण असेल? मी स्वतः की अन्य हे येत्या दोन दिवसात तुम्हाला कळवण्यात येईल असेही ते म्हणाले. ओबीसी नेते असो, की महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव पडणारे पवार कुटुंबीय असो ओबीसीच्या आरक्षणावर काही बोलत नाहीत. ओबीसींचा आरक्षण संपलंय असंच म्हणावं लागेल असे हाके म्हणाले. शरद पवार यांनी निवडणुकांमध्ये मूळ ओबीसींना तिकीट देऊ अशी भूमिका जाहीर केली होती. परंतू, जेव्हा निवडणुका आल्या त्यावेळेस त्यांनी केलेल्या घोषणेनुसार काहीही पाळले नाही अशी टीका हाके यांनी केली.



ओबीसींचे प्रश्न मांडण्यासाठी समाजातील तमाम राजकीय सामाजिक विचारवंतांचे लक्ष वेधण्यासाठी ही निवडणूक लढवीत आहोत असे हाके म्हणाले. सहानुभूतीच्या मुद्द्यावर जर निवडणुका बिनविरोध होत असतील तर ते लोकशाहीसाठी घातक आहे. त्यामुळे बारामतीची निवडणूक आम्ही बिनविरोध होऊ देणार नाही येत्या दोन दिवसात उमेदवार जाहीर करु असे हाके म्हणाले. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आदरांजली म्हणून सर्व पक्ष ही निवडणूक बिनविरोध करत असताना आम्ही यात कुठलाही खोडा घालत नाही. राजकारणामध्ये अचूक टायमिंग साधणारे पवार कुटुंबीय जर तिसऱ्या दिवशी शपथ घेत असेल स्वतःच्या मुलीच्या लग्नाची तारीख घोषित करत असतील, आजोबा आणि नातू राज्यसभेवर जात असतील तर आम्ही निवडणूक का लढवू नये? असा सवाल हाकेंनी केला. दुःख काय सामान्य माणसांनीच करायचं का? भाजपनेही बारामतीत उमेदवार उभा करावा असे हाके म्हणाले. तुम्ही सहानुभूतीच्या आडून दुखाच्या आडून कशाला निवडणुकीला सामोरे जात आहात. ओबीसींच्या आरक्षणाच्या बाबतीत अजितदादा असंवेदनशील होते. ते आता स्वर्गवासी झाले आहेत. काय योगदान आहे तुम्ही सांगा मला असे हाके म्हणाले. सारथी पार्टी आणि अन्य आर्थिक विकास महामंडळांना तुम्ही भरघोस निधी देत आहात, परंतु महाज्योतीला दूजाभाव केला जात आहे. अजित पवारांच्या हयातीत आर्थिक विकास महामंडळ यांना अध्यक्षपद दिले नाही कार्यालय दिले नाही. एका घरात पाच पाच सहा संविधानिक पद, मग आम्ही टीका कुणावर करायची? असा सवाल हाकेंनी केला.

# राजेगावला दोन गटातील वादात एकाचा खून, दोघे जखमी

दौंड । प्रतिनिधी

राजेगाव (ता. दौंड) येथे दोन गटातील अंतर्गत वादातून एकाचा खून झाल्याची घटना सोमवारी (दि. ३०) रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणी दौंड पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





याबाबत पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, मारहाणीच्या या घटनेत विजेंद्र भोसले या तरुणाचा खून झाला असून दोन जण जखमी आहेत. त्यांच्यावर भिगवण येथील हॉस्पिटल येथे उपचार चालू आहेत. या प्रकरणी ऋषिकेश संजय भोसले यांच्या फिर्यादीवरून सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. यातील जनार्दन भोसले व महेश भोसले दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे तर योगेश भोसले, दिनेश भोसले, निलेश भोसले, राज भोसले हे चार जण फरारी आहेत.

फरार चार आरोपींच्या शोधात दोन पथके पोलिसांकडून पाठविण्यात आली आहेत. दोन गटात पूर्वी पासून शेतीचा वाद होता त्यातच सोमवारी जल प्राधिकरणाच्या कनेक्शनवरुन किरकोळ वादातून ही घटना धारदार हत्याराने मारहाणीपर्यंत गेल्यानंतर ही घटना घडली. घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक सुनील उगले करीत आहेत.

# चौथ्या वर्षाच्या पदवीसाठी पुणे विद्यापीठाची मार्गदर्शक सूचना जाहीर

पुणे: राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू होऊन तीन वर्षे पूर्ण झाली असून, चौथ्या वर्षाला सुरुवात झाली आहे. परंतु अद्याप चौथ्या वर्षांच्या ऑनर्स पदवी, ऑनर्स विथ रिसर्च पदवीबाबत विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांना कोणतेही मार्गदर्शन करण्यात आलेले नव्हते. यासंदर्भात अधिसभेत आवाज उठवला गेला. अखेर विद्यापीठाने मार्गदर्शक सूचना जाहीर करून संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या असल्याचे स्पष्ट झाले आहे.






विद्यापीठाच्या अधिसभेत स्वायत्त महाविद्यालयांच्या चार वर्षे पदवी अभ्यासक्रमाबाबत डॉ. बाळासाहेब सागडे यांनी स्थगन प्रस्ताव मांडला. त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. राज्यातील सर्व स्वायत्त महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २३-२४ पासून पदवीस्तरावर सुरू झाली आहे.

शैक्षणिक वर्ष २६-२७ पासून सर्व स्वायत्त महाविद्यालयात पदवीचे चौथे वर्ष सुरू होणार आहे. चौथ्या वर्षाची ऑनर्स पदवी, ऑनर्स विथ रिसर्च पदवी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. त्यामुळे विद्यापीठाने पदव्युत्तर पदवी व ऑनर्स पदवी प्रवेश द्यावयाच्या विषयांची प्रवेशक्षमता अजून निश्चित केलेली नाही.

तसेच त्यासाठी पात्रता काय असेल, याबाबतही निर्णायक भूमिका घेण्यात आली नसल्याचे अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आणले. विद्यापीठाने चौथ्या वर्षाच्या मार्गदर्शक सूचनांचा तब्बल १२ पानांचा मसुदा जाहीर केला असून, महाविद्यालयांनी संबंधित सूचना विद्यार्थ्यांना कळविणे गरजेचे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

यामध्ये प्रशासनाला करावी लागणारी कामे, शैक्षणिक मार्गदर्शन सूचना, चौथ्या वर्षात काय अभ्यासक्रम असणार आहे, चौथ्या वर्षाची क्रेडीट सिस्टिम कशी असेल, चौथ्या वर्षातील प्रवेश प्रक्रिया नेमकी कशी राबवायची आदींचा या मसुद्यात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची पूर्ण अंमलबजावणी करण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# पीएमपीएमएल बसमध्ये क्यूआर कोड; प्रवाशांसाठी डिजिटल सुविधा

पुणे: पीएमपी प्रशासनाने 'आपली पीएमपीएमएल' पच्या वापरकर्त्यांची संख्या वाढवण्यासाठी नवा फंडा राबविण्याचे नियोजन केले आहे. पचे वापरकर्ते वाढवून त्याच्या माध्यमातून प्रवाशांना अधिक सुलभ व वेगवान सेवा देण्यासाठी आता बसमधील प्रत्येक सीटच्या मागे क्यूआर कोड लावला जाणार आहे.



हा क्यूआर कोड स्कॅन केल्यावर प्रवाशांना पीएमपीचे प डाऊनलोड करता येणार आहे. पीएमपीचे नवे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी या नावीन्यपूर्ण उपक्रमाची माहिती दिली.

पीएमपी प्रशासनाने डिजिटल प्रवासाला प्रोत्साहन देण्यासाठी कंबर कसली आहे. सध्या अनेक प्रवाशांना पबद्दल माहिती असूनही ते डाऊनलोड करण्यास टाळाटाळ करतात. ही अडचण दूर करण्यासाठी बसमधील प्रत्येक सीटच्या मागे एक विशिष्ट क्यूआर कोड असेल. प्रवासादरम्यान आपल्या जागेवर बसूनच प्रवासी तो कोड स्कॅन करू शकतील. स्कॅन करताच थेट पीएमपीएमएल प डाऊनलोड करण्याची लिंक उपलब्ध होईल.या मोहिमेद्वारे जास्तीत जास्त ग्राहकांना डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याचा प्रशासनाचा मानस आहे. पमुळे प्रवाशांना बस सध्या कुठे आहे आणि किती वेळात येईल, याची अचूक माहिती मिळणार आहे. प्रवाशांना रांगेत उभे न राहता मोबाईलवरून तिकीट किंवा पास काढण्याची सुविधा मिळेल. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी उपलब्ध बस मार्ग क्रमांक शोधणे सोपे होणार आहे.

# पुरंदर तालुक्यात गॅस वितरण व्यवस्थेचा बोजवारा, वशिलेबाजांना प्राधान्य; सामान्य नागरिक मात्र रांगेत उभा

पुरंदर । प्रतिनिधी

तालुक्यात सिलिंडर गॅस वितरणाचा पूर्ण बोजवारा उडाला आहे. नियमाप्रमाणे बुकिंग केल्यानंतर निर्धारित वेळेत सिलेंडर टाकी मिळणे अपेक्षित आहे. मात्र, सासवडमधून ग्रामीण भागातील वितरकांकडे होणारा पुरवठा पूर्णपणे बंद केल्याने नागरिकांना सासवडच्या केंद्रावर नाईलाजास्तव उन्हात तासनतास उभे राहावे लागत आहे. वशिलेबाजांना प्राधान्य दिले जात आहे. सामान्य नागरिक मात्र रांगेत उभा आहेत, असं नागरिकांनी सांगितलं आहे.



युद्धजन्य परिस्थितीत केंद्र आणि राज्य शासनाने नागरिकांना घरगुती आणि व्यावसायिक सिलिंडर गॅस वापरावर मोठ्या प्रमाणात निर्बंध आणले आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे सिलिंडरवरती अवलंबून असलेल्या कुटुंबियांच्या मोठ्या प्रमाणात अडचणी वाढल्या आहेत. सासवडमधील प्रविण गॅस एजन्सी हे पुरंदर तालुक्याचे गॅस वितरणाचे मुख्य केंद्र आहे. येथूनच तालुक्याच्या ग्रामीण भागात सिलिंडर टाक्यांचा पुरवठा करण्यात येतो. युद्धजन्य परिस्थितीत वितरण व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. परिणामी सासवडमधून ग्रामीण भागातील पुरवठा पूर्णपणे बंद केला आहे. त्यामुळे गावोगावचे छोटे वितरक आणि ग्राहकांमध्ये वाद होण्यास सुरुवात झाली. तालुक्यातील नागरिकांना सिलिंडर टाक्यांचा पुरवठा सुरळीत व्हावा, नागरिकांना त्रास होवू नये यासाठी तहसील कार्यालयाकडून गोपाळ ठाकरे हे पुरवठा आणि वितरण निरीक्षक म्हणून कामकाज पाहत आहेत. मात्र, सासवडच्या वितरण केंद्रावर ग्राहकांची शेकडोंच्या संख्येने गर्दी होत आहे. तरीही वितरक आणि ग्राहक यांच्यात अक्षरशः हाणामारीच्या घटना घडत आहेत, पोलिसांना बोलावून परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण, पुरवठा निरीक्षक गोपाळ ठाकरे हे कुठेही दिसून येत नाहीत. पुरवठा निरीक्षक केवळ नामधारी आणि कुचकामी ठरले आहेत.

# पिंपरी-चिंचवडकरांना अवकाळी पावसाचा मोठा तडाखा

पिंपरी । प्रतिनिधी

अवकाळी पावसाच्या पहिल्याच सरीत पिंपरी-चिंचवड शहरातील पायाभूत सुविधांची पोलखोल झाली असून महापालिकेच्या मान्सूनपूर्व नियोजनातील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. अचानक झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचणे, वाहतूक कोंडी आणि वीजपुरवठा खंडित होणे अशा समस्यांनी नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.सोमवारी (दि. ३०) दुपारी मेघगर्जना आणि गारांच्या सरींसह सुमारे एक ते दोन तास कोसळलेल्या पावसाने शहरातील जनजीवन विस्कळीत केले. अनेक भागांत पाणी साचल्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला, तर काही ठिकाणी पूर्णतः ठप्प झाला.



महापालिकेकडून सुरू असलेल्या खोदकामामुळे शहरातील अनेक रस्ते चिखलमय झाले आहेत. विशेषतः निगडी ते दापोडी मार्गावरील सर्व्हिस रस्त्यावर भूमिगत जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू असल्याने संत तुकारामनगर मेट्रो स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात चिखल साचल्याचे दिसून आले. चिंचवड स्टेशन परिसरातही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे वाहन घसरून अपघात होण्याच्या घटना घडल्या.पावसाळ्यापूर्वी नाले व गटारे साफ न केल्यामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले. उघडी गटारे आणि चेंबरची झाकणे नसल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला. काही भागांत वीजपुरवठा खंडित झाल्याने सिग्नल यंत्रणा बंद पडली आणि प्रमुख चौकांमध्ये वाहतूक कोंडी झाली. ऐन पावसात वाहनचालकांना कोंडीत अडकून त्रास सहन करावा लागला, तर दुचाकीस्वारांना भिजत प्रवास करावा लागला. याशिवाय, काही ठिकाणी झाडांच्या फांद्या कोसळल्या, तर जोरदार वाऱ्यामुळे जाहिरात फलकांचे फ्लेक्स फाटून उडत असल्याचे चित्रही पाहायला मिळाले. अचानक आलेल्या पावसामुळे अनेक नागरिक विविध ठिकाणी अडकून पडले.या संपूर्ण घटनेतून महापालिका प्रशासनाच्या मान्सूनपूर्व तयारीचा अभाव स्पष्ट झाला असून, आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# अखिल भा. म पत्रकार परिषद मुंबई संलग्न पुणे जि. महिला व लोणावळा शहर पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महिलादिनानिमित्त महिला पत्रकार व रणरागिणीचा सन्मान सोहळा

पुणे । प्रतिनीधी

लोणावळा -. लोणावळा येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, मुंबई संलग्न पुणे जिल्हा महिला पत्रकार व लोणावळा शहर पत्रकार संघाच्या वतीने राज्यस्तरीय महिला पत्रकार व रणरागिणीना सन्मानित करण्यात आले कार्यक्रमाच्या सुरवात महिलादिन विशेष काव्य मैफिलीने करण्यात आली. सादरकर्त युवा साहित्य प्रतिष्ठान मुंबई. कवी संतोष खरटमोल कवी आनंद रांजणे कवी ओमकार देसाई कवीयत्री सविता देशमुख यांनी अप्रतिम से कवी मैफिल जमवली त्यात एक छोटी कलाकार मृण्मई काळे व शोभा आहेर यांनी सुंदर कविता सादर केली

स्वागत गीत सुनिल मस्के यांनी आपल्या सुरेख व दमदार आवाजात-जय जय महाराष्ट्र माझा सादर केले प्रस्तावना पुणे जिल्हा अध्यक्ष श्रावणी कामत यांनी केली कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मा.सारिकाताई सुनिल आण्णा शेळके ह्या होत्या. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद अध्यक्षा शोभा जयपुरकर, सरचिटणीस विद्या म्हासूर्णेकर, जिल्हा अध्यक्ष सुनिल लोणकर, राज्य कार्यकारणीचे सदस्य अनिल वडघुले, जेष्ठ पत्रकार चंद्रकांत जोशी, नगराध्यक्ष राजेन्द्र सोनावणे, नंदकुमार वश्रळंज (उद्योजक ) व जेष्ठ पत्रकार कुमठकर श्रीराम यांनी मनोगत व्यक्त केल्या.








परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या मार्गदर्शन खाली हा कार्यक्रम व महिला हे घर सांभाळून बाहेरची काम करतात त्यांना त्यांच्या कामाची पावती व पाठीवर थाप मिळावी हा छोटा सा प्रयन्त.. त्याना पुढील कार्यास शुभेच्या व अभिनंदन.

वसंत व्याख्यान माला

लोणावळा, नेतृत्व बचत गट, वुमन्य फाउडेशन, इंडियन स्काउट गाईड फेलोशिप लोणावळा गिल्ड.. आधारस्तंभ बचत गर, वैदही बचत गटनिवारा वृद्धाश्रम च्या छाया काळे हिरकणी महिला स्वयंसहायता बचत गट सिधुताई कविश्वर, डॉ, सिमा शिंदे परमेश्वरी दामले, विभावरी इंगळे, नयना आभाळे,दक्षता कमिटी, दामिनी पथक, जेष्ठ नागरीक संघ.यांना पुरस्कारदेऊन सन्मानित करण्यात आले. सर्व महिला पत्रकारांचे ट्रॉफी व शाल देऊन सन्मान करण्यात आले.

या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सारिका ताई शेळके,दिपालीताई हुलावळे , रेश्मा देवकर, नंदकुमार वश्रळंज (उद्योजक),अनिल वडघुले, सुनिल लोणकर (जिल्हा अध्यक्ष ), राजेद्र सोनावणे(नगराध्यक्ष )सभापती स्वप्मा कदम,नारायण पळिकर, शोभा जपुरकर, विद्या म्हासुर्णेकर,लोणावळा शहर पत्रकारसंघाचे अध्यक्ष रवीं संजय पाटील, पुणे शहर अध्यक्ष प्रमोद गव्हाणे,विशाल विकारी,माऊली भोसले,प्रशांत पुराणिक,बापु पाटील, श्रीराम कुमठेकर, जेष्ठ पत्रकार चंद्रकांत जोशी ,डॉ. हेमंत अगरवाल,मा.नगरसेविका

ब्रिन्दा गणत्रा,उमा मेहता, सुषमा कडू सुजाता गुरव रेखा भेगडे ,प्रज्ञा आबनवे,वर्षा चव्हाण,सुनिता आगळे,आदी मान्यवर उपस्थित होते तसेच आदित्य कामत,प्रफुल सोनवणे सुनिल मस्के, अवनी आगळे यांचा कार्यक्रमांस मोलाचा वाटा सूत्रसंचालन सुनिता कसबे व रश्मी शिरसकर तर आभार शोभा जयपुरकर यांनी मानले